cmyk

## संपादकीय

### बोटचेपी भुमिका अन् काँग्रेसचा तथ्याला धरून आरोप

गेल्या काही काळातील चीनची भारताच्या संबंधातील भूमिका पाहिली तर चीन आपल्याशी कधीही सरळ वागलेला नाही हे स्पष्ट दिसत आहे. चीनने भारतीय हद्दीत अनेक ठिकाणी घुसखोरी केली आहे ही वस्तुस्थितीच आहे. भारतीय हद्दीतील किमान ३० ठिकाणची नावे चीनने परस्पर बदलून ही गावे आपल्या हद्दीत असल्याचा दावा केला आहे. भारतीय हद्दीत किंवा हद्दीलगत त्यांनी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची उभारणी करून भारतापुढे मोठे आव्हान निर्माण केले आहे.


# दैनिक राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–८२ | गुरूवार, दि.१७ जुलै २०२५ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये


### राज्य सरकारकडे पैसे नसल्याने महाज्योतीचे १२६ कोटी थकले!

मुंबईः सरकारकडे पैसेच नसल्याने महाज्योतीमधील संशोधक विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीचे पैसे थकले असल्याची माहिती समोर आली आहे. या विद्यार्थ्यांना २०२१–२२ वर्षाच्या थकबाकीची रक्कम देणे प्रलंबित आहे. यासाठी १२६ कोटी रुपयांची आवश्यकता असून हा निधी मिळावा, यासाठी इतर मागास बहुजन कल्याण विकास विभागामार्फत मुख्यमंत्री आणि अर्थमंत्र्यांकडे मागणी करण्यात आलेली आहे. निधी उपलब्ध करण्यासाठी पाठपुरावा सुरु आहे. निधी मिळाल्यानंतर विद्यार्थ्यांना प्रलंबित शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येईल, अशी माहिती सामाजिक न्याय मंत्री संजय शिरसाट यांनी विधान परिषदेत दिली.

# केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत पंतप्रधान धन धान्य योजनेला मान्यता

नवी दिल्ली । वृतसंस्था

केंद्रीय मंत्रिमंडळाने पंतप्रधान धन धान्य कृषी योजनेसाठी मान्यता दिली आहे. पुढील सहा वर्षांसाठी ३६ योजनांच्या एकत्रीकरणातून प्रत्येक वर्षी २४ हजार कोटी रुपयांचा निधी पीएम कृषी धन धान्य योजनेला देण्यात येणार असल्याची माहिती माहिती व प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी दिली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली बुधवारी (दि.१६) मंत्रिमंडळाची बैठक झाली यात हा निर्णय घेण्याता आला. या बैठकीला विविध मंत्री उपस्थित होते.

## २४ हजार कोटी रुपयांचा मिळणार निधी ; केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय



मंत्री अश्विनी वैष्णव म्हणाले, ''२०२५–२६ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी कृषी क्षेत्राच्या विकासासाठी पीएम धन धान्य कृषी योजनेची घोषणा केली होती. या योजनेतून कमी उत्पादकता, कमी पेरणी क्षेत्र आणि कमी कर्ज उपलब्धता असणाऱ्या १०० जिल्ह्यांवर विशेष लक्ष्य केंद्रित करण्यात येणार आहे. त्यासाठी या जिल्ह्यांमधील शेतकऱ्यांसाठी हवामान बदल अनुकूल बियाणे, काढणी पश्चात सुविधा, गोदामाची निर्मिती, सिंचन सुविधेवर भर देण्यात येणार आहे.'' असे मंत्री वैष्णव यांनी माध्यमांना सांगितले. या योजनेचे उद्दिष्ट कृषी ◀◀ पान २ वर

### जिल्हा, राज्य , राष्ट्रीय पातळीवर समित्या

या योजनेसाठी नियोजन, अंमलबजावणी आणि देखरेखीसाठी जिल्हा, राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर समित्या स्थापन केल्या जाणार आहेत. जिल्हा कृषी आणि संलग्न उपक्रम योजना जिल्हा धन धान्य समितीद्वारे अंतिम केली जाईल. यात प्रगतीशील शेतकरी तसेच जिल्हा योजना पीक, पाणी आणि माती आरोग्य संवर्धन सदस्य असतील प्रत्येक जिल्ह्यात नियुक्त केलेले केंद्रीय नोडल अधिकारी योजनेचा आढावा घेतील.

## थोडक्यात...

### भारतात ५ वर्षांत ६५ विमानांचे बंद पडले इंजिन!

नवी दिल्ली : गेल्या पाच वर्षांत भारतातील ६५ विमानांचे इंजिन टेकऑफ किंवा हवेत असताना बंद पडले. याचा अर्थ दर महिन्याला किमान एक विमान इंजिन बंद पडते. तथापि, सर्व प्रकरणांमध्ये, वैमानिक एकाच इंजिनवर विमान उतरवू शकले आणि जवळच्या विमानतळावर पोहोचू शकले. माहितीच्या अधिकाराखाली नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाकडून ही माहिती मिळाली आहे. खरे तर, अहमदाबाद अपघाताच्या प्राथमिक चौकशी अहवालात विमानाचे दोन्ही इंजिन बंद पडल्यामुळे हा अपघात झाल्याचे उघड झाले होते. त्याच वेळी आरटीआय अहवालात असेही उघड झाले आहे की, १ जानेवारी २०२४ ते ३१ मे २०२५ या १७ महिन्यांत ११ विमानांमधून 'मेडे' कॉल आले होते. यामध्ये तांत्रिक बिघाडाची माहिती देऊन आपत्कालीन लँडिंगची मागणी करण्यात आली होती. यापैकी चार विमाने हैदराबादमध्ये उतरली.

### एकनाथ शिंदे, आनंदराज आंबेडकर यांची युतीची घोषणा

मुंबईः राज्यातील आगामी निवडणुकीसाठी शिवसेना आणि रिपब्लिकन सेनेच्या युतीची घोषणा शिंदे शिवसेनेचे नेते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी बुधवारी (दि.१६) संयुक्तपणे केली. यावेळी दोघांनीही पत्रकार परिषदेत संबोधन केले. एकनाथ शिंदे मुख्यमंत्री असताना त्यांनी अनेक चांगल्या योजना आणल्या. सर्वांना सोबत घेऊन जाणारे ते नेते आहेत. त्यामुळे आम्ही त्यांच्यासोबत जाण्याचा निर्णय घेतला आहे. आंबेडकरी कार्यकर्त्यांना सांभाळून घेण्याची विनंती त्यांना आम्ही केली आहे. राज्यातील आगामी सर्व निवडणुकीसाठी आमची युती काम करेल, अशी प्रतिक्रिया रिपब्लिकन सेनेचे प्रमुख आनंदराज आंबेडकर यांनी यावेळी दिली.

### राज्यातील अवैध सावकारांवर कारवाई होणार–सहकारी मंत्री

मुंबईः राज्यात अवैध सावकारांनी शेतकऱ्यांची ७७१ हेक्टर जमीन हडपण्याचा प्रयत्न केला. परंतु सहकार विभागाने या प्रकरणात योग्य कारवाई करून शेतकऱ्यांना जमीन परत मिळवून दिली आहे, अशी माहिती राज्याचे सहकारी मंत्री बाबासाहेब पाटील यांनी बुधवारी (दि.१६) दिली. राज्यातील अवैध सावकारीचा मुद्दा प्रश्नोत्तरच्या तासात शिवसेना उबाठा गटाचे आमदार संजय देरकर यांनी उपस्थित केला होता. या चर्चेत नाना पटोले, समीर कुणावार यांनी सहभाग घेतला. सहकार मंत्री पाटील म्हणाले, ''राज्यातील अवैध सावकारीच्या १० हजार तक्रारी दाखल झाल्या होत्या. त्यापैकी ८ हजार १०० तक्रारीमध्ये तथ्य नसल्याचे आढळून आले. परंतु सहकार विभागाने शेतकऱ्यांच्या जमिनी हडपणाऱ्या अवैध सावकारांवर कारवाई केली आहे.

### मी पुन्हा येईन, चिंता करू नका – अंबादास दानवे

मुंबई : शिवसेना ठाकरे गटाचे ज्येष्ठ नेते अंबादास दानवे यांचा विधान परिषदेतील कार्यकाळ संपुष्टात येणार आहे. यानिमित्ताने बुधवारी विधान परिषदेत त्यांचा निरोप समारंभ पार पडला. यावेळी दानवे म्हणाले की मी फडणवीसांप्रमाणे पुन्हा येईन, चिंता करू नका. अंबादास दानवे ऑगस्ट २०१९ मध्ये विधान परिषद सदस्य म्हणून छत्रपती संभाजीनगर–जालना स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मतदारसंघातून निवडून आले होते. ४४ दिवसांनंतर त्यांचा विधान परिषदेतील कार्यकाळ संपणार आहे. त्यानिमित्ताने बुधवारी त्यांचा निरोप समारंभ पार पडला. दहावीला असताना अशापद्धतीने निरोप समारंभ शाळेत झाला होता. त्यानंतर पहिल्यांदा असा निरोप समारंभ होत आहे. पण दहावीला निरोप समारंभ झाल्यानंतर कॉलेजला जावे लागले. देवेंद्र फडणीसांप्रमाणे मी पुन्हा येईन, त्याची चिंता करण्याची गरज नाही, अशी मिश्किल टिप्पणी अंबादास दानवेंनी केल्यानंतर सभागृहात हशा पिकला.

# परळीतील मयत महादेव मुंडेंच्या पत्नीचा एसपी कार्यालयातच आत्मदहनाचा प्रयत्न





बीड । प्रतिनिधी

परळीतील व्यापारी महादेव मुंडे यांची २० ऑक्टोबर २०२३ रोजी हत्या झाली होती या घटनेला १८ महिने उलटून गेली मात्र अद्यापही आरोपीना अटक करण्यात आली नाही आरोपी मोकाट फिरत असल्याने कुटुंबीयांमध्ये तीव्र संताप आहे. आज (१६ जुलै) महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे, त्यांचे आई–वडील आणि मुलांनी पोलिस अधीक्षक यांची भेट घेऊन आरोपीच्या अटकेची मागणी करण्यासाठी आले भेटी नंतर कार्यालयाबाहेर ज्ञानेश्वरी मुंडे यांनी आत्मदहनाचा ◀◀ पान २ वर

# राज्य लोकतंत्र च्या बातमीने खळबळ दिवस उजडताच बालकामगार गायब



राज्य लोकतंत्र

16 Jul 2025 - Page 1

बाल मजुरी विरोधी कायदा फक्त कागदावरच

जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत उभारते बालमजुराच्या श्रमावर

कंत्राटदारावरच गुन्हा दाखल करावा?

अधिकारी कर्मचाऱ्यांना हे दिसत नाही का

बीड । प्रतिनिधी

दैनिक राज्य लोकतंत्रणे बुधवार दिनांक १६ जुलै रोजीच्या अंकामध्ये बालकामगार विरोधी कायदा फक्त कागदावरच जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत उभारतेय बाल कामगाराच्या श्रमावर ही बातमी प्रकाशित झाल्यानंतर जिल्हा प्रशासनान, कामगार कल्याण कार्यालय खडबडून जागे झाले असे घडलेच नाही हे दाखवण्यासाठी अगदी दिवस उजडताच बाल कामगार गायब झाल्याचे चित्र दुसऱ्या दिवशी पहावयास मिळाले.

बीड जिल्ह्यामध्ये अनेक ठिकाणी धोकादायक कामामध्ये बालकामगारांचा समावेश आहे आणि त्यांच्याकडून जोखमीची कामे ◀◀ पान २ वर

## लोकमान्य टिळक यांचे पणतू डॉ.दीपक टिळक यांचे निधन

पुणे । प्रतिनिधी

लोकमान्य टिळक यांचे पणतू आणि 'केसरी' या वृत्तपत्राचे विश्वस्त संपादक डॉ. दीपक जयंत टिळक यांचे निधन झाले. बुधवारी पहाटेच्या सुमारास त्यांनी पुण्यातील राहत्या घरी अखेरचा श्वास घेतला. बुधवारी सकाळी ८ ते ११ च्या दरम्यान त्यांचे पार्थिव अन्त्यदर्शनासाठी टिळकवाड्यात ठेवण्यात आले होते.



डॉ. दीपक टिळक यांनी शिक्षण, पत्रकारिता, सामाजिक कार्य या क्षेत्रांत उल्लेखनीय योगदान दिले असून, टिळक कुटुंबाच्या सामाजिक कार्याचा वारसा त्यांनी प्रामाणिकपणे पुढे नेला. डॉ. दीपक टिळक हे लोकमान्य बाळ गंगाधर टिळक यांचे पणतू होते. त्यांनी 'केसरी'चे विश्वस्त संपादकपद भूषवले आहे. डॉ. दीपक ◀◀ पान २ वर

## गेवराईच्या बळीराजा मल्टीपलवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश

गेवराई । प्रतिनिधी

तालुक्यातील छत्रपती मल्टिस्टेट ने अनेक ठेवीदाराला गंडा घातल्यानंतर आता बळीराजा मल्टीपल निधी लि. गढी या संस्थेत ठेवलेली मुदत ठेव परत मिळत नसल्याने ठेवीदाराने न्यायालयात धाव याप्रकरणी कोर्टाने पैसे न देणाऱ्या या संस्थेवर गुन्हा दाखल करण्याचे आदेश दिले आहेत.

याप्रकरणी ठेवीदाराच्या बाजूने ॲड. शरद काळे यांनी कोर्टात बाजू मांडली.ठेवीदाराच्या आत्महत्या नंतर छत्रपतीमल्टीस्टेट आणि त्याचा फरारचेअरमन संतोष भंडारी हे राज्यात गाजत असताना आता गेवराई तालुक्यातून आणखी एक मल्टीपल निधी संस्थेचा घोटाळा उघडकीस आला आहे. यामुळे गेवराई तालुक्यात या मल्टीस्टेट आणि मल्टीपल निधी मध्ये चाललंय तरी काय? असा प्रश्न उपस्थित केला जात आहे. वामन भगवानराव गित्ते यांनी ३ लाख रुपये बळीराजा मल्टीपल निधी लि.गढी येथे मुदत ठेव म्हणून ठेवली होती. त्यांना गरज पडल्याने यांनी रक्कम परत मागीतली पण त्यांना नेहमीच उडवा उडवीची उत्तरे देण्यात आली. यानंतर त्यांनी संचालक केशव शेषणारायण पंडीत, भरत नारायण ढाकणे, रामदास दहीफळे यांच्याकडे ठेवीची मागणी केली. पण त्यांनी ही सतत टाळाटाळ केली. ◀◀ पान २ वर

## गेवराईत शिक्षकाचे घरफोडून चार लाखाचा मुद्देमाला लाबवला

बीड । प्रतिनिधी

अज्ञात चोरट्यांनी घराच्या किचनकडील दरवाज्याचे लॉक तोडून घरामध्ये प्रवेश करत घरातील कपाटामधील बॅगमध्ये ठेवलेले सोन्या–चांदीचे दागिने असा तीन ते चार लाख रुपयांचा ऐवज चोरून नेल्याची घटना दोन दिवसांपूर्वी गेवराई तालुक्यातील गैबी नगर तांडा येथे शिक्षकाच्या घरी घडली. या प्रकरणी चकलांबा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्याविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

गैबीनगर तांडा येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षक म्हणून कर्तव्य जावणारे अण्णासाहे गोपीनाथ चव्हाण हे रात्री जेवण करून झोपले. अज्ञात चोरट्यांनी या संधीचा गैरफायदा घेत त्यांनी चव्हाण याचंया घराच्या किचनच्या दरवाज्यातून ◀◀ पान २ वर

## पीएम किसानचा २० वा हप्ता दोन दिवसात जमा होणार




नवी दिल्ली । वृतसंस्था

देशभरातील कोट्यवधी शेतकऱ्यांसाठी दिलासादायक बातमी आहे. प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेचा २० वा हप्ता येत्या दोन दिवसांत शेतकऱ्यांच्या बँक खात्यात जमा होणार आहे.

आतापर्यंत या योजनेत १९ हप्ते वितरीत करण्यात आले असून, २० व्या हप्त्याची उत्सुकतेने वाट पाहणाऱ्या शेतकऱ्यांची प्रतिक्षा आता संपुष्टात येत आहे. मिळालेल्या माहितीनुसार, १८ किंवा १९ जुलै २०२५ रोजी ही रक्कम ◀◀ पान २ वर

## रोहित पवारांना मोठी जबाबदारी, शरद पवारांकडून नातवाला पॉवर

### महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीसपदी निवड केल्याची खा.सुप्रीया सुळे यांच्याकडून घोषणा



पुणे । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्षाने आमदार रोहित पवार यांना मोठी जबाबदारी सोपवत पक्षातील त्यांचे स्थान बळकट केले आहे. पक्षाने जयंत पाटील यांना प्रदेशाध्यक्षपदावरून हटवून शशिकांत शिंदे यांची नवे अध्यक्ष म्हणून निवड केल्यानंतर अवघ्या २४ तासांत रोहित पवार यांची महाराष्ट्र प्रदेश सरचिटणीस तसेच सर्व फ्रंटल आणि सेलच्या प्रभारीपदी नियुक्ती करण्यात आली.

पक्षाच्या कार्याध्यक्षा खासदार सुप्रिया सुळे यांनी ही घोषणा करत रोहित यांच्या नेतृत्वाखाली पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला. सुप्रिया सुळे म्हणाल्या, ◀◀ पान २ वर

## बीडचे अतिरिक्त जिल्हाधिकारी कुलकर्णी सह १२ अधिकाऱ्यांना आयएएस पदोन्नती

बीड । प्रतिनिधी

बीडचे तत्कालीन अतिरिक्त जिल्हाधिकारी त्रिगुण कुलकर्णी यांच्यासह राज्यातील १२ अधिकाऱ्यांना आयएएस म्हणून पदोन्नती देण्यात आली असून याची घोषणा महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केली आहे त्रिगुण कुलकर्णी यांनी आपल्या कार्यकाळामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाची इमारत उभी करण्यासाठी मोठे प्रयत्न केले होते.

त्रिभुवन कुलकर्णी यांनी बीड जिल्ह्याचे अतिरिक्त जिल्हाधिकारी म्हणून काही काळ कार्यभार सांभाळा त्यांच्या कार्यकाळामध्ये जिल्हाधिकारी कार्यालयाची ◀◀ पान २ वर

# जायकवाडीतून माजलगाव धरणासाठी पाणी सुटले, शेतकऱ्यांना दिलासा

## आ.विजयसिंह पंडित यांच्या मागणीला यश

गेवराई । प्रतिनिधी

पावसाने दडी मारल्यामुळे खरीपाचे पिके धोक्यात आली आहेत. पुरेसा पाऊस नसल्याने जमीनीचा ओलावा कमी होत आहे. ऊस, कापूस, सोयाबीन यांसारख्या नगदी पिकांची वाढ खुंटली आहे. दुबार पेरणीच्या संकटामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण पसरलेले दिसते. जायकवाडी धरणाच्या कालव्यातील पाण्याच्या नियोजना संदर्भात मंगळवार, दि.१५ जुलै रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्याकडे महत्वाच्या बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या बैठकीत गेवराईचे आ. विजयसिंह पंडित यांनी कालव्यातून सिंचनासह माजलगाव धरणासाठी पाणी सोडण्याची मागणी केली होती. मंत्री महोदयांनी ही मागणी मान्य करून पाणी सोडण्याचा निर्णय घेतला, त्यानुसार बुधवार, दि.१६ जुलै रोजी दुपारी ४ वाजता जायकवाडी जलाशयातून माजलगाव धरणासह सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे.



पावसाने दडी मारल्यामुळे खरीपाची पिके धोक्यात आली आहेत. खरीप पिकांसाठी पावसाची मोठी गरज असताना त्यात खंड पडल्यामुळे शेतकरी चिंतेत आहे. ऊस, कापूस, सोयाबीन, मुग, उडीद यांसारख्या पिकांच्या पेरणीसह मशागतीवर मोठा खर्च करून दुबार पेरणीचे संकट निर्माण होते की काय ? असा प्रश्न आता उपस्थित झाला आहे. जायकवाडी धरण व कालव्याच्या लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी किमान धरणातील पाणी कालव्यात सोडून सिंचनाची व्यवस्था करण्याची मागणी वारंवार केली होती. शेतकऱ्यांच्या मागणीनुसार आ. विजयसिंह पंडित यांनी ही बाब राज्याच्या जलसंपदा मंत्र्यांच्या निदर्शनास आणून दिली. ◀◀ पान २ वर

## सरपंच ग्रामसेवकांने केला १७ लाखाचा अपहार

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील सुरनरवाडी ग्रामपंचायत अंतर्गत १४ वा आणि १५ वा वित्त आयोगामध्ये अनियमितता व भ्रष्टाचार झाल्याचा प्रकार उघडकीस आला. यामध्ये माजी सरपंचासह शाखा अभियंतासह माजी ग्रामसेवकांनी १७ लाख रूपयांचा अपहार केला. या प्रकरणी विस्तार अधिकाऱ्यांनी तक्रार दाखल केल्याने सरपंचासह पाच जणां विरोधात शिरसाळा पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सुरनरवाडीच्या ग्रामपंचायतला १४ वा आणि १५ वा असा वित्त आयोगाचा निधी आलेला होता. तत्कालीन ग्रामसेवक, शाखा अभियंता, सरपंच व इतरांनी संगनमत करून १७ लाख ७९ हजार २४९ रूपयांचा अपहार केला. सदरील हा प्रकार प्रशासनाच्या निदर्शनास आल्यानंतर या प्रकरणी विस्तार अधिकारी ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.१६ जुलै २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ५५.०० क्विंटल | २,४२५ | २,९१० | २,६७८ |
| ज्वारी/हायब्रिड: ६४.५० क्विंटल | २,००० | ४,००० | २,५७१ |
| मका/लोकल:१०.५०क्विंटल | २,१५१ | २,१५१ | २,१५१ |
| तूर : १.५० क्विंटल | ४,००० | ६,३९६ | ५,१९८ |
| उडीद : १.५० क्विंटल | ५,००० | ५,००० | ५,००० |
| बाजरी: ३७.०० क्विंटल | २,००० | २,७५५ | २,४५८ |
| मुग: ०.५० क्विंटल | ६,९०० | ६,९०० | ६,९०० |
| सोयाबीन: ७.०० क्विंटल | ४,२५० | ४,२५० | ४,२५० |
| हरभरा: १.५० क्विंटल | ५,३०१ | ५,५५१ | ५,४२६ |

cmyk

## अग्रलेख

# बोटचेपी भुमिका अन् काँग्रेसचा तथ्याला धरून आरोप

गेल्या काही काळातील चीनची भारताच्या संबंधातील भूमिका पाहिली तर चीन आपल्याशी कधीही सरळ वागलेला नाही हे स्पष्ट दिसत आहे. चीनने भारतीय हद्दीत अनेक ठिकाणी घुसखोरी केली आहे ही वस्तुस्थितीच आहे. भारतीय हद्दीतील किमान ३० ठिकाणची नावे चीनने परस्पर बदलून ही गावे आपल्या हद्दीत असल्याचा दावा केला आहे. भारतीय हद्दीत किंवा हद्दीलगत त्यांनी मोठ्या प्रमाणात पायाभूत सुविधांची उभारणी करून भारतापुढे मोठे आव्हान निर्माण केले आहे. लडाख आणि अन्य भागातही चीनच्या घुसखोरीचा विषय भारतासाठी चिंताजनक आहे, एवढेच नाही तर आंतरराष्ट्रीय पातळीवरही चीनने सतत पाकिस्तानची पाठराखण केली आहे. केवळ चीनच्या पाठिंब्यावर पाकिस्तान आंतरराष्ट्रीय पातळीवर गमजा मारत आहे या वस्तुस्थितीकडे आपल्याला डोळेझाक करता येणार नाही.

भारताचे परराष्ट्र व्यवहार मंत्री एस. जयशंकर सध्या चीन दौऱ्यावर गेले आहेत. तेथे त्यांनी चीनच्या सर्व प्रमुख नेत्यांसह जिनपिंग यांचीही भेट घेऊन द्विपक्षीय संबंधांवर चर्चा केली. या भेटीनंतर एस. जयशंकर यांनी जी भूमिका मांडली आहे, त्यावरून सध्या वादंग माजत आहे. जयशंकर म्हणाले आहेत की, चीनबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी आम्ही एकत्रित प्रयत्न करीत असून या संबंधांमध्ये आता बरीच सुधारणा झाली आहे. एस. जयशंकर यांच्या नेमक्या याच दाव्याला काँग्रेसने जोरदार आक्षेप घेतला आहे. काँग्रेसच्या प्रवक्त्या सुप्रिया श्रीनेत यांनी एक पत्रकार परिषद घेऊन यासंबंधीची विस्तृत पार्श्वभूमी कथन केली. त्या म्हणाल्या, की पहेलगाम हल्ल्याला आज ८५ दिवस झाले आणि त्यानंतर पाकिस्तानबरोबर आपला जो संघर्ष उडाला त्या संघर्षाच्या वेळी चीन पाकिस्तानच्या बाजूने ठामपणे उभा राहिला. एवढेच नाही तर भारतीय लष्कराचे उपप्रमुख लेफ्टनंट जनरल राहुल सिंह यांनी अलीकडेच एक ठोस विधान करताना असे नमूद केले आहे की, पाकिस्तानबरोबर आपला जेव्हा संघर्ष झाला त्यावेळी आपण केवळ एकट्या पाकिस्तानच्या विरोधात नव्हे तर एका अर्थाने चीनच्याही विरोधात लढत होतो. कारण चीनने पाकिस्तानला बरीच शस्त्रास्त्रे मदत केली आहे. आज चीनकडे जी अत्याधुनिक लष्करी सामग्री आहे त्यातील तब्बल ८५% सामग्री त्यांना चीनकडून मिळाली आहे. या पार्श्वभूमीवर भारत सरकारचे चीनबाबत नेमके धोरण काय आहे, चीन भारताच्या विरोधी भूमिका घेत असतानाही मोदी सरकार चीनबरोबरचे संबंध सुधारण्यासाठी इतके आग्रही का आहे, असा प्रश्न काँग्रेसने विचारला आहे. त्यांच्या प्रश्नात तथ्य आहे. अगदी अलीकडच्या काळात भारताला विकासासाठी जी सामग्री अपेक्षित आहे ती भारताला द्यायलाच चीनकडून निर्बंध घातले गेले आहेत. त्यात टनेल बोरिंग मशीनपासून अनेक वस्तूंचा समावेश आहे. त्या उलट अनेक ग्राहक उपयोगी वस्तू भारतात निर्यात करून दोन्ही देशातील व्यापार समतोल चीनकडून सातत्याने बिघडवला गेला आहे. भारत आणि चीन यांच्यातील भारतीय बाजूची व्यापार तूट १०० अब्ज डॉलरच्या आसपास असल्याचे सांगितले जात आहे. म्हणजेच चीन आपल्याकडून कमी माल आयात करतो आणि भारताला अतिप्रचंड माल निर्यात करतो, हे त्यांचे व्यापार धोरण भारताला अडचणीत आणण्यासाठीच आहे हे स्पष्ट आहे. त्याही पलीकडे जाऊन जर विचार केला तर, चीनने भारताभोवती असलेल्या श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश अशा देशांवर आपला प्रभाव टाकून त्यांना आपल्या प्रभावाखाली घेतले आहे. त्यांच्या भूमीचा वापर करून चीन तेथे आपले लष्करी सामर्थ्य वाढवत आहे, त्यामुळे चीनने आपल्याला चारही बाजूने घेरले असल्याचे चित्र स्पष्ट होते आहे. त्यावर अनेक आंतरराष्ट्रीय तज्ज्ञांनी भारताला जागे करण्याचा प्रयत्न केला, पण या सगळ्या गोष्टीकडे दुर्लक्ष करून एस जयशंकर चीनमध्ये जाऊन त्यांच्याशी संबंध अधिक दृढ करण्याची भाषा करतात हे मात्र बुचकळ्यात टाकणारे आहे. किंबहुना चीनबाबत आपण अधिक ठोस आणि नेमकी भूमिका घेण्यात कमी पडत आहोत का, असा प्रश्न त्यातून निर्माण होत आहे. जयशंकर यांच्या चीन भेटीबाबत आणि त्यांनी केलेल्या विधानाबाबत ते भारतात आल्यानंतर त्यांना प्रश्न विचारले जातील किंवा भारतीय संसदेमध्ये या विषयावरून सरकारकडून स्पष्टीकरण मागवले जाईल, निदान त्यावेळी तरी भारत सरकारने आपल्या चीनबरोबरच्या संबंधांविषयी अधिक नेमकेपणाने देशवासीयांना माहिती देण्याची गरज आहे. चीनबरोबरच्या विषयावर यापूर्वीही अनेक वेळा काँग्रेस आणि अन्य विरोधी पक्ष सदस्यांनी सरकारला अनेक प्रश्न विचारले होते; पण सरकार चीनबरोबरच्या संबंधांबाबत कधीच स्पष्ट बोलायला उत्सुक दिसले नाही. ऑपरेशन सिंदूरमध्ये पाकिस्तानला मदत करणाऱ्या चीनबाबत आता भारताला असे लेचेपेचे धोरण घेऊन चालणार नाही.

# तलावाच्या भिंतीवरच अवैध बांधकाम; तलाव फुटण्याचा धोका!

## विभागिय आयुक्ताकडे स्वाभिमानी शेतकरी संघटनेची तक्रार



तलवाडा । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील तलवाडा येथे गावा लगत सरकारी गायरान जमिनी वर अंदाजे १०० ते १०२ एकर क्षेत्रामध्ये विस्तीर्ण अशा स्वरुपात असणाऱ्या पाझर तलावाच्या संरक्षण भिंतीवर कोणत्याही प्रकारचा अधिकार नसताना तलवाडा ग्रामपंचायतच्या तत्कालीन ग्रामसेवक व सरपंचांनी आर्थिक लाभाच्या उद्देशाने गैरव्यवहार करत अतिक्रमण धारकांना पी. टी. आर. दिल्याने अतिक्रमणधारकाने भिंत कोरून खोदकाम व बांधकाम सुरु असल्यामुळे गाव तलावास व संपुर्ण गावातील लोकांच्या जिवीतास धोका निर्माण झाला आहे. हा गैर व्यवहार करणाऱ्या व अतिक्रमण धारकावर योग्य ती कारवाई करण्यात यावी. या संदर्भात स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने यांनी दिनांक १५/७/२०२५ रोजी विभागिय आयुक्त कार्यालय संभाजी नगर यांच्याकडे तक्रार केली आहे.

निवेदनात तक्रार कर्त्यांनी म्हटले आहे की, तलवाडा तालुका गेवराई ग्रामपंचायत हद्दीतील गावाच्या पश्चिमेस असणाऱ्या सरकारी गायरान जमिनीमध्ये अंदाजे १०० एकर क्षेत्रावर विस्तीर्ण अशा स्वरूपात पाझर तलाव आहे. सदर पाझर तलावाचे खोलीकरणाचे काम सन २००१२-१३ मध्ये ख्रिसलेस फाउंडेशन पुणे, व अखिल भारतीय जैन संघटना यांच्यामार्फत तलावातील साचलेला गाळ शेतकऱ्यांच्या शेतात मोफत पुरवठा व्हावा या उद्देश्याने या तलावाच्या खोलीकरणाचे काम तत्कालीन माननीय विभागीय आयुक्त सुनील केंद्रेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आलेले आहे. तसेच केंद्रेकर यांच्या मार्गदर्शनाखालीच सदर तलावाच्या संरक्षण भिंतीचे मजबूतीकरणाचे देखील काम करण्यात आलेले आहे. सदर तलावाची पाणी साठवण क्षमता खूप मोठी वाढलेली आहे. परंतु आर्थिक लाभाच्या उद्देशाने तलवाडा ग्रामपंचायत सरपंच व ग्रामसेवक यांनी काही लोकांकडून लाखो रुपये वसूल करून गैरव्यवहार केलेला आहे. सरपंच व ग्रामसेवक ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा यांना शासकीय पी.टी. आर. देण्याचा कुठलाही व कोणत्याही प्रकारचा अधिकार नसताना हा गैरव्यवहार केलेला आहे. विशेष बाब म्हणजे त्याच तलावाच्या संरक्षण भिंतीवरचे पिटीआर ग्रामपंचायत कार्यालय तलवाडा यांनी दिलेले आहेत. तलावाची भिंत कोरून त्या ठिकाणी आज रोजी सुद्धा अतिक्रमण धारक बेसमेंट बांधकाम करू लागलेले आहेत व काही जणांनी पक्क्या स्वरुपातील बांधकाम केलेले आहे. भविष्यात तलावात पाणीसाठा जास्त झाल्यास कोरल्या जाणाऱ्या संरक्षण भिंतीच्या ठिकाणी तलावाची संरक्षण भिंत फुटण्याची शक्यता नाकारताच येत नाही. हा भविष्यातील संभाव्य धोका व ग्रामस्थांची जीवित हानी व वित्त हानी टाळण्यासाठी आज रोजीच योग्य ती कारवाई करण्यात यावी अशी मागणी निवेदनाच्या शेवटी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे युवा जिल्हा उपाध्यक्ष शेख खिजर जैनोदीन व जयदेव शिंगने यांनी केली आहे. सदर प्रकरणी काही ग्रामस्थांनी स्थानीय अधिकाऱ्याकडे वारंवार तक्रारी अर्ज केलेले आहेत. एवढेच काय, काही ग्रामपंचायत सदस्यांनी सुद्धा सदर गैरव्यवहार प्रकरणा विरोधात अमरण उपोषण सुद्धा केलेले आहे. परंतु आजपर्यंत कुठल्याही वरिष्ठ अधिकाऱ्यांनी हे प्रकरण गांभीर्याने घेत सदर गैर व्यवहार करणाऱ्या वर कोणत्याही प्रकारची कारवाई केलेली नाही. तरी सदर प्रकरणी नम्र विनंती करण्यात येते की हा गैरव्यवहार करणाऱ्या वर योग्य ती कडक कार्यवाही करण्यात यावी, आस्या प्रकारची मागणी निवेदनाच्या शेवटी करण्यात आली आहे.

## चार हजाराची लाच घेतानी तलाठी पकडला

अंबड । प्रतिनिधी

लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या (लाप्रवि) जालना युनिटने अंबड शहरात यशस्वी सापळा रचून ग्राम महसूल अधिकारी श्रीपाद देशपांडे यांना ४००० रुपये लाच स्वीकारताना रंगेहाथ पकडले.

तक्रारदार : पुरुष, वय ३५ वर्ष, आरोपी अधिकारी देशपांडे, वय ५१ वर्ष, पद ग्राम महसूल अधिकारी, सेवा विठ्ठल टॉवर, घर क्र. ४०४, शनिमंदिर, जालना तक्रारदाराने अंबड शहरात एक रिकामा प्लॉट खरेदी केला होता, आणि त्या प्लॉटचा फेर तक्रारदाराच्या नावे घेण्यासाठी ग्राम महसूल अधिकारी देशपांडे यांनी ६००० रुपयांची लाचेची मागणी केली होती. तक्रारदाराने लाच देण्यास नकार देत दि. १५ जुलै २०२५ रोजी लाप्रवि, तक्रार दाखल केली. पडताळणी आणि सापळा कारवाई त्याच दिवशी तक्रारीची पडताळणी करताना, आरोपी श्रीपाद देशपांडे यांनी तडजोडीअंती ४००० रुपये स्वीकारण्यास सहमती दर्शवली. यावरून आज दिनांक १५ जुलै रोजी सापळा रचण्यात आला. ठिकाण : मत्स्योदरी देवी मंदिराजवळील सभामंडप, अंबड साक्षीदारांच्या समक्ष, आरोपी यांनी ४००० रुपये लाच तक्रारदाराकडून स्वीकारताच, सापळा पथकाने त्यांना रंगेहाथ पकडले. आरोपीकडून जप्त केलेली रक्कम : ४,०००/- रुपये (लाचेची रक्कम) इतर वस्तू : सॅमसंग मोबाईल फोन, रोख ४६०/- रुपयेमोबाईल ताब्यात घेऊन त्याचे विश्लेषण व तपास सुरु आहे. घराजवळ झडती प्रक्रियाही सुरु आहे. अंबड पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे. सापळा कारवाईतील अधिकारी सापळा अधिकारी : कोमल शिंदे, पोलीस निरीक्षक, लाप्रवि जालना सहायक अधिकारी : बी. एस. जाधवर, पो. उपअधीक्षक, लाप्रवि जालना पर्यवेक्षक अधिकारी : बी. एस. जाधवर, पो. उपअधीक्षक, लाप्रवि जालना, पोहेकॉ. श्रीनिवास गुडूर, गणेश चेके, शिवलिंग खुळे, चालक पोहेकॉ. बिनोरकर

# शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी विकसित महाराष्ट्र सर्वेक्षणात सहभागी व्हावे-जिल्हाधिकारी

**बीड । प्रतिनिधी**

विकसित महाराष्ट्र २०४७ चे नागरिक सर्वेक्षण १७ जुलै, २०२५ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या सर्वेक्षणात सामान्य नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे, जेणेकरून त्यांच्या समस्या, शासनाकडून असलेल्या अपेक्षा याबाबत माहिती घेऊन त्यानुसार रोडमॅप तयार करणे शक्य होणार आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रथम सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी स्वतः https://wa.link/O93s9m या लिंकवर



क्लिक करुन सर्वेक्षणात सहभागी व्हावे. आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना देखील सर्वेक्षणात सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे. तद्नंतर आपल्या अधिनस्त किंवा संपर्कात येणाऱ्या सर्व नागरि कांना सर्वेक्षणात सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहित करावे. आपल्या गावातील, शहरातील तसेच नातेवाईक, मित्रांच्या व्हाट्सएप ग्रुपवरुन याबाबत जागृती करावी, जेणेकरुन बीड जिल्ह्यातून जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग नोंदविणे शक्य होणार असल्याचेही जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी शासकीय यंत्रणाना सांगितले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ०६ मे २०२५ ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये विकसित महाराष्ट्र २०४७ करिता व्हिजन डॉक्यूमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

# शिष्यवृत्तीसाठी महाविद्यालयीन शिबिरे आयोजित करावीत-एडके

**जालना । प्रतिनिधी**

**भारत सरकारकडून पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती देण्यात येते. तरी सन २०२५-२६ वर्षामधील अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे अर्ज नोंदविण्यासाठी प्राचार्यांनी महाविद्यालयीन शिबिरे आयोजित करून जास्तीत जास्त अर्ज नोंदणी होण्यासाठी प्रयत्न करावेत, असे आवाहन समाज कल्याणचे सहायक आयुक्त राजु एडके यांनी केले.**

अनुसूचित जाती प्रवर्गातील प्रवेशित विद्यार्थ्यांचे भारत सरकार पोस्ट मॅट्रीक शिष्यवृत्ती व फ्रीशिप योजनांचे अर्ज महाडीबीटी प्रणालीवर ऑनलाईन सादर करण्यासाठी आज दि. १५ जुलै २०२५ रोजी जिल्ह्यातील महाविद्यालयाच्या प्राचार्यांची सहायक आयुक्त, समाजकल्याण, जालना या कार्यालयात बैठक संपन्न झाली. यावेळी सन २०२४-२५ वर्षातील ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप अर्ज नोंदणी केलेली नाही त्यांच्यासाठी तसेच महाविद्यालय लॉगिनवर प्रलबिंत असलेले अर्ज तात्काळ पडताळणी करून पात्र अर्ज मंजुर करण्यासाठी तसेच सन २०२३-२४ मधील ज्या विद्यार्थ्यांचे अर्ज त्रुटी अभावी विद्यार्थी लॉगिनला पाठविण्यात आलेले आहेत त्यांना त्रुटी पुर्तता करून रिऑप्लाय करण्यासाठी दि. ३१ जुलै २०२५ अंतिम मुदत देण्यात आलेली आहे. अशी सुचना सर्वांना देण्यात आली.

# अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद,शाखा बीडच्या वतीने ज्येष्ठ नागरीकांसाठी सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन

## संधीकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा...!

**बीड । प्रतिनिधी**

**अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद शाखा,बीड आणि सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू महाविद्यालय,नाट्यशास्त्र विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक १७ जुलै २०२५ रोजी ज्येष्ठ नागरीकांसाठी संधीकाली या अशा, धुंदल्या दिशा दिशा या सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात करण्यात आले आहे.ज्येष्ठ नागरिकांच्या जीवनामध्ये आनंद निर्माण व्हावा, त्यांच्या कला गुणांना वाव मिळावा, त्यांना जे छंद तरूण वयात असताना जोपासता आले नाहीत त्यासाठी एक रंगमंच उपलब्ध करून देण्याच्या हेतूने अध्यक्ष अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद,शाखा बीड तथा नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर यांच्यावतीने दरवर्षीप्रमाणे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.**

या कार्यक्रमाचे उद्घाटन मा.डॉ.योगेश भारतभूषण क्षीरसागर सचिव नवगण शिक्षण संस्था राजुरी नवगण यांच्या हस्ते होणार आहे. त्यामध्ये गीतगायन,नृत्य, नाटिका, काव्यवाचन, स्टॅंडअप कॉमेडी इ.सांस्कृतिक कार्यक्रम होणार आहेत. तरी सदरील कार्यक्रमासाठी बीड शहरातील सर्व रसिक श्रोते कलावंतांनी सहभाग घ्यावा व उपस्थित असे आवाहन अध्यक्ष मराठी नाट्य परिषद बीड तथा नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर आणि प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर,डॉ.संजय पाटील देवळाणकर,डॉ.दुष्यंता रामटेके यांनी केले आहे.

## पान १ वरून...

### केंद्रीय मंत्रिमंडळ बैठकीत पंतप्रधान

उत्पादकता वाढवणे, पीक विविधीकरण आणि शाश्वत कृषी पद्धतींचा अवलंब करणे, कापणीनंतर गाव आणि तालुका पातळीवर साठवण क्षमता वाढवणे , सिंचन सुविधा सुधारणे आणि दीर्घकालीन आणि अल्पकालीन कर्ज उपलब्धता सुलभ करणे हे आहे. या योजनेची अंमलबजावणी ११ विभागांच्या ३६ चालू योजना, राज्यांच्या इतर योजना आणि खाजगी क्षेत्राच्या स्थानिक मदतीने करण्यात येणार आहे. दरम्यान, योजनेमुळे कृषी आणि संबंधित क्षेत्रांमध्ये उत्पादकता वाढेल. तसेच पिकांचे मूल्यवर्धन होईल आणि स्थानिक रोजगार निर्माण होईल. परिणामी या योजनेमुळे देशांतर्गत उत्पादन आणि आत्मनिर्भरता वाढेल, असा दावा केंद्र सरकारकडून करण्यात आला आहे.

**या निकषांवर जिल्ह्यांची निवड**

प्रामुख्याने कमी उत्पादकता, कमी पीक लागवड आणि कमी कर्ज वितरण या तीन प्रमुख निर्देशकांच्या आधारे १०० जिल्हे निवडले जाणार आहेत. तसेच या योजनेअंतर्गत प्रत्येक राज्यातील किमान एक जिल्हा निवडला जाणार आहे. जिल्ह्याची निवड निव्वळ पीक क्षेत्रावर करण्यात येणार आहे.

-----------

### राज्य लोकतंत्र च्या बातमीने खळबळ

करून घेतली जातात बालकामगार कायद्यामध्ये दोन भाग आहेत त्यामध्ये दहा ते १४ आणि १४ ते १८ असा वयोगट आहे १० ते १४ यातील मुले वीट भट्टी शोभेची दारू किंवा अन्य ठिकाणी काम करताना आढळली तर संबंधितावर कारवाई केली जाते त्या वरचा गट म्हणजे २१ च्या आतील गटाविरुद्ध वेगळ्या स्वरूपाची कारवाई केली जाते परंतु बीड शहरातील झमझम कॉलनी मध्ये मागील महिन्यामध्ये पर राज्यातील काही बालकामगारांची एका सोडा फॅक्टरी मधून सुटका करण्यात आली होती हे प्रकरण अगदी ताजे असतानाच बीडमध्ये होत असलेल्या जिल्हाधिकारी यांच्या नूतन इमारत बांधकामावर ही बालकामगार आढळून आल्याने त्याचे वृत्त दैनिक राज्य लोक तंत्र मध्ये प्रकाशित करण्यात आले होते या वृत्तानंतर जिल्हा प्रशासनात चांगलीच खळबळ उडाली होती प्रामुख्याने वृत्त प्रकाशित झाल्यानंतर सकाळी मात्र जिल्हाधिकारी कार्यालय आणि तहसील कार्यालयाच्या नूतन इमारत कामावर एकही संशयित बालकामगार दिसून आला नाही म्हणजेच या वृत्तानंतर हे बालकामगार गायब झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले यासंदर्भात निवासी उपजिल्हाधिकारी स्वामी कार्यकारी अभियंता तोंडे उपकार्यकारी अभियंता बोराडे यांच्याशी संपर्क साधला असता त्यांनी मात्र असे बाल कामगार नसल्याचे ठामपणे सांगितले या सर्व कामगारांना आयडी दिली जाते असे सांगितले केवळ टाळाटाळ केली असली तरी फोटो खोटे बोलत नाहीत आता काहीतरी नवीन अडचण निर्माण होऊ शकते म्हणून ते अज्ञात कामगार हलवल्याची माहिती आहे मात्र जेव्हा सकाळी पुन्हा प्रत्यक्ष पाहणी केली असता या कामावरील बालकामगार मात्र गायब झाल्याचे चित्र पाहावयास मिळाले.

-------------

### परळीतील मयत महादेव मुंडेंच्या पत्नीचा

प्रयत्न केला. पोलिसांनी प्रसंगावधान राखत बाटल्या जप्त केल्या.

केज तालुक्यातील संतोष देशमुख हत्या प्रकरणाने मोठी खळबळ उडवून दिली होती. या प्रकरणानंतर बीड जिल्ह्यातील गुन्हेगारीचे गंभीर चित्र सर्वांसमोर आले होते. याच काळात महादेव मुंडे यांच्या हत्येचे प्रकरण समोर आले होते. त्यांच्या हत्या प्रकरणातील आरोपी मोकाट असल्याचा आरोप महादेव मुंडे यांच्या पत्नी ज्ञानेश्वरी मुंडे यांनी केला आहे. आज ज्ञानेश्वरी मुंडे या एसपींना भेटल्या होत्या. यावेळी त्यांनी कारवाई न झाल्यास कुटुंबासह आत्मदहन करण्याचा इशारा दिला होता.त्यांनी केलेली मागणी पूर्ण न झाल्याने सांडलेल्या मुंडे यांनी पोलिस अधीक्षक कार्यालयाबाहेर आत्मदहनाचा प्रयत्न केला यावेळी ज्ञानेश्वरी मुंडे आणि पोलिसांमध्ये झटापटही झाली. १८ महिन्यांपासून सुरू असलेला संघर्ष अद्याप न्यायाच्या टोकापर्यंत पोहोचलेला नाही.पोलिसांनी आत्मदहनाचा प्रयत्न हणून पडला मात्र मुंडे या याच ठिकाणी बेशुद्ध झाल्याने त्यांना तातडीने जिल्हा रुग्णालयात हलवण्यात आले आता त्यांना आयसीयू मध्ये उपचार चालू आहेत.

--------------------

### गेवराईत शिक्षकाचे घरफोडून

घरात प्रवेश केला. घरातील कपाटामध्ये असलेली बॅग उघडून त्यामधून रोख रकमेसह दीड तोळ्याची सोन्याची पट्टी गंठण, सोन्याचे झुंबर, शॉर्ट गंठण, सोन्याची नथ, लॉकेट असे एकूण तीन ते चार लाख रुपयांचा ऐवज अज्ञात चोरट्यांनी चोरून नेला. या प्रकरणी अण्णासाहेब चव्हाण यांनी चकलांबा पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यावरून पोलिसांनी अज्ञात चोरट्यांविरोधात गु.र.नं. २५७/२०२५ कलम ३३१ (४), ३०५ भा.न्यास.२०२३ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

------------

### गेवराईच्या बळीराजा मल्टीपलवर गुन्हा दाखल

यामुळे ठेवीदार वामन गित्ते यांनी कोर्टात धाव घेतली, ठेवीदारच्या बाजूने अॅड. शरद काळे यांनी युक्तीवाद केला व त्यांच्या प्रभावी युक्तीवाद ऐकल्यानंतर न्यायालयाने पोलीस स्टेशन गेवराई यांना भारतीय न्याय सहिता चे कलम ६१(२),३१६(२),३१६(५),३१८(४) व महाराष्ट्र ठेविदाराचे वित्तीय संस्थामधील हितसंबंधाचे संरक्षण अधिनियम१९९९ चे कलम ३ व ४ प्रमाणे या कलमानुसार गुन्हा नोंद करण्याचे आदेश दिले. यावेळी फिर्यादीच्या वतीने अॅड. शरद. काळे यांनी बाजू मांडली त्यांना अॅड.ए.बी.पौळ व अॅड.आयाज नवाज शेख यांनी सहकार्य केले.

----------

### लोकमान्य टिळक यांचे पणतू

टिळक हे काही काळ टिळक महाराष्ट्र विद्यापीठाचे कुलगुरू आणि काही काळ कुलपती देखील राहिले होते. २०२१ मध्ये जपान सरकारच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाकडून जपानी भाषेच्या प्रसारासाठी केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले होते.

------------

### बीडचे अतिरिक्त जिल्हाधिकारी कुलकर्णी

इमारत बांधकामाचा शुभारंभ झाला त्यांच्याच कार्य काळामध्ये बीड जिल्ह्यातील गौण खनिज खडी क्रेशर धारक यांच्यावर कारवाई करण्यात आली होती मात्र त्यांच्या बदलीनंतर ही प्रक्रिया पुन्हा थांबली राज्य शासनाने आज राज्यातील १२ वरिष्ठ अधिकाऱ्यांना आहेस केडर बहाल करत पदोन्नती बहाल करण्यात आली महाराष्ट्रातील महसूल विभागातील बारा वरिष्ठ अधिकाऱ्यांना भारतीय प्रशासकीय सेवेत पदोन्नती दिली गेली त्यामध्ये त्रिकोण कुलकर्णीसह विजय सिंह देशमुख विजय भाकरे गजानन पाटील महेश पाटील पंकज देवरे मंजरी मनोलकर आशा पठाण राजलक्ष्मी शहा सोनाली मुळे गजेंद्र बावणे प्रतिभा इंगळे यांचा समावेश आहे.

------------

### रोहित पवारांना मोठी जबाबदारी,

यशवंतराव चव्हाण आणि शरद पवार यांच्या विचारांना अनुसरून रोहित पवार काम करतात. नवे प्रदेशाध्यक्ष शशिकांत शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिव-फुले-शाहू-आंबेडकर यांच्या वैचारिक चौकटीला बळकटी देण्यासाठी रोहित कार्यरत राहतील. रोहित यांच्याकडे सर्व फ्रंटल सेलच्या प्रभारीपदाची जबाबदारी देण्यात आल्याने त्यांना आता सर्व सेलचा अहवाल सादर करावा लागेल. या नियुक्तीमुळे रोहित पवार पक्षात 'आपली माणसं' आणून प्रभाव वाढवतील, अशी चर्चा आहे. पक्षाने त्यांना 'पॉवरफुल' केल्याने राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू आहे.

------------

### पीएम किसानचा २० वा हप्ता

खात्यात जमा केली जाऊ शकते. पंतप्रधान मोदी १८ जुलै रोजी बिहारच्या मोतिहारी दौऱ्यावर असतील आणि अशी चर्चा आहे की तिथूनच ते २० वा हप्ता वितरित करतील. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांनी अद्याप बँक तपशील किंवा मोबाईल क्रमांक अपडेट केलेले नाहीत, त्यांनी त्वरित हे सर्व पूर्ण करावे. पीएम किसान योजनेअंतर्गत, पात्र शेतकऱ्यांना वर्षाकाठी ६ हजाराची आर्थिक मदत दिली जाते. ती तीन समान हप्त्यांमध्ये दिली जाते. यापुर्वी १९ वा हप्ता म्हणून २४ फेब्रुवारी २०२५ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुमारे ९.८ कोटी शेतकऱ्यांना २२००० कोटींची रक्कम वितरित केली होती.

------------

### सरपंच ग्रामसेवकांने

बाबुराव दगडू राऊत यांच्या फिर्यादीवरून आरोपी लता चंद्रसेन काळे ( माजी सरपंच), बीन एन पवळ (शाखा अभियंता), आर के चौरे (माजी ग्रामसेवक), विजय राठोड (माजी ग्रामसेवक) आणि एम एल सय्यद (शाखा अभियंता )या पाच जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

---------

### जायकवाडीतून माजलगाव धरणासाठी

मंगळवार, दि.१५ जुलै रोजी जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी जायकवाडी धरणाच्या कालव्यातील पाण्याच्या नियोजनासाठी बैठकीचे आयोजन विधानभवन येथे केले होते. या बैठकीत गेवराई विधानसभा मतदार संघाचे आ. विजयसिंह पंडित यांनी जायकवाडी धरणाच्या पैठण उजव्या कालव्यातून माजलगाव धरण आणि शेतकऱ्यांना सिंचनासाठी पाणी सोडण्याची विनंती केली होती. या बैठकीत उपस्थित लोकप्रतिनिधींनी सुध्दा अशा प्रकारची मागणी लावून धरली. त्यांच्या मागणीची दखल घेऊन कालव्यात पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला. बुधवार, दि.१६ जुलै रोजी दुपारी ४ वाजता जायकवाडी जलाशयातून माजलगाव धरणासह सिंचनासाठी पाणी सोडण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना दिलासा मिळाला असून काही प्रमाणात त्यांच्या पिकांना जीवनदान मिळणार आहे. यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांनी आनंद व्यक्त केला आहे.

## टी.सी.हरवला आहे

अशोक मोहन ताटे या नावाचा १० वी पासचा टी.सी पिंपळनेर ते बीड प्रवासात हरवला आहे. ज्या कोणास सापडल्यास खालील क्रमांकावर संपर्क करावा.

-::संपर्क::-

मो.९९२१७६२५७०

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

गुरुवार दि. १७ जुलै २०२५




## कास्ट्राईबची जिल्हास्तरीय सहविचार सभा संपन्न!

माजलगाव : महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची जिल्हास्तरीय सहविचार सभा डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका येथे उत्साहात संपन्न झाली.या सभेमध्ये विविध विभागातील कास्ट्राईब कर्मचाऱ्यांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. सभेच्या अध्यक्षस्थानी माजलगाव महासंघाचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार होते.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश गावडे यांनी तर प्रस्ताविक भारत टाकणखार यांनी केले.यावेळी महासंघाचे ज्येष्ठ नेते सूर्यकांत जोगदंड,लातूर विभागीय अध्यक्ष बालासाहेब सोनवणे,माजी जिल्हाध्यक्ष रमेश माटे,दिनकर जोगदंड जिल्हाध्यक्ष केशव आठवले,सुमेध जोगदंड,डॉ संतोष बोबडे,बप्पाजी कदम,बा.म.पवार,संतोष दाणी,यशवंत सर,राजकुमार सोनवणे तसेच विविध तालुक्यांतील पदाधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.या सहविचार सभेत कास्ट्राईब कर्मचार्यांच्या सेवाशर्ती, पदोन्नतीतील अडचणी, सामाजिक न्याय व कल्याण विभागाच्या योजनांचा लाभ, आधार कार्ड आधारित संच मान्यता रद्द करणे,जुनी पेन्शन आदी तसेच संघटनेच्या भविष्यातील दिशा व मुजोर प्रशासकीय अधिकाऱ्यांची कार्ययोजना यावर सखोल चर्चा करण्यात आली.कर्मचारी वर्गास भेडसावणाऱ्या विविध समस्या मांडून त्यावर उपाययोजनांचा ठोस आराखडा ठरविण्यात आला.

# हलगर्जी करणाऱ्या तलाठी, मंडळाधिकाऱ्यांना तंबी

## जिवंत सात बारा ही मोहिम यशस्वीपणे राबवा-हरिष धार्मिक

**शेतीच्या मालकी हक्कात अडथळा ठरणाऱ्या मयत खातेदार यांच्या नावांची ७/१२ उताऱ्यावरुन नोंद कमी करण्यासाठी मोठा निर्णय महाराष्ट्र शासन महसूल विभागाने घेतला असून संपूर्ण महाराष्ट्रात जिवंत सातबारा मोहीम राबवली जात असल्याचे निर्दर्शनास आणून देत आष्टी तालुक्यात ही मोहिम प्रभावीपणे राबविणार असल्याचे तहसीलदार वैशाली पाटील यांनी सांगितले.**

आष्टी । प्रतिनिधी

**शेतीच्या मालकी हक्कात अडथळा ठरणाऱ्या मयत खातेदार यांच्या नावांची ७/१२ उताऱ्यावरुन नोंद कमी करण्यासाठी मोठा निर्णय महाराष्ट्र शासन महसूल विभागाने घेतला असून दि. १ एप्रिल पासून संपूर्ण महाराष्ट्रात जिवंत सातबारा मोहीम राबवली जात असल्याचे निर्दर्शनास आणून देत आष्टी तालुक्यात आपण मंडळ अधिकारी,तलाठी यांनी कामात हालगर्जीपणा न करता हि मोहिम यशस्वीपणे राबवावी असे आवाहन अप्पर जिल्हाधिकारी हारिष धार्मिक यांनी सांगितले.**



आष्टी तहसिल कार्यालयात आज बुधवार (दि.१६) रोजी तालुक्यातील जिवंत ७/१२ या मोहिमेचा आढावा घेण्यासाठी बीडचे अप्पर जिल्हाधिकारी हारिष धार्मिक यांनी आढावा बैठकी घेतली यावेळी ते बोलत होते.या प्रसंगी उपविभागीय अधिकारी वसिमा शेख, तहसिलदार वैशाली पाटील,नायब तहसिलदार प्रकाश सिरसेवाड,नायब तहसिलदार अश्विनी पडोळे,भगिरथ धारक,जयदत्त चव्हाण आदि उपस्थित होते.पुढे बोलतांना धार्मिक म्हणाले,जमीनीचा मालकी हक्क गाजविणारे दस्तऐवज म्हणजे सातबारा.कारण सातबाऱ्यावरील नोंदणीमुळे जमीन किती आहे कुठे आहे आणि कोणाच्या मालकीची आहे हे सिद्ध होते.त्यामुळे सातबारा उताऱ्याबाबत सरकार नेहमीच सतर्क असते. कारण बऱ्याचवेळा बनावट कागदपत्रांना बळी पडून शेतकरी हातची जमीन गमावून बसतात. अशाच गैर प्रकारांना आळा घालण्यासाठी सरकारने सातबारा उताऱ्याबाबत मोठा निर्णय घेतला आहे.याविषयी आज मंडळानिहाय आढावा घेतला असून ब-याच मंडळात असमाधानी कार्य असल्याचे दिसून आले आहे.अजून १५ दिवसांनी मी आढावा घेण्यासाठी येणार असून सर्व मंडळ अधिकारी व तलाठी यांनी कामात हालगर्जीपणा करू नये असा इशारा ही अप्पर जिल्हाधिकारी यांनी दिला.

## पवार, मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित सेवा सप्ताहाच्या प्रारंभी ६३ रक्तदात्यांचे उत्स्फूर्त रक्तदान

अंबाजोगाई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. ना. अजितदादा पवार तथा माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांचा वाढदिवसॅनिमित्त आयोजित सेवा सप्ताहात विविध सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे.या सप्ताहाचा प्रारंभ ग्रामदैवता माता श्री योगेश्वरी देवीची महाआरती करून करण्यात आली. त्यानंतर चनई येथील किरमानी बाबांच्या दर्ग्यावर फुलांची चादर चढवून अजितदादा पवार व धनंजय मुंडे यांच्या निरोगी व दीर्घायुष्यासाठी प्रार्थना करण्यात आली. याप्रसंगी राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी यांच्यासह बीड जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण, माजी आमदार संजय दौंड, ॲड विष्णुपंत सोळंके,सत्यजित सिरसाट राजाभाऊ औताडे, बालासाहेब शेप,बबन लोमटे यांच्यासह शेकडो सहकारी उपस्थित होते.



राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष राजकिशोर मोदी तथा बीड जिल्हाध्यक्ष ॲड राजेश्वर चव्हाण यांच्या पुढाकारातुन १५ ते २२ जुलै दरम्यान ''सात दिवस सात उपक्रम'' संकल्पनेवर आधारित अंबाजोगाई शहरात सेवा सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. या सप्ताहा अंतर्गत आरोग्य, पर्यावरण, स्वच्छता, शिक्षण तथा जनजागृती अशा विविध विषयावर आधारित विविध कार्यक्रमाची रेलचेल असणार आहे.

या सेवा सप्ताहाच्या प्रारंभी स्वामी रामानंद तीर्थ रुग्णालयाच्या शासकीय रक्तपेढी येथे रक्तदान शिबिराचे आयोजन देखील करण्यात आले होते. या रक्तदान शिबिराचे उद्घाटन राजकिशोर मोदी, ॲड राजेश्वर चव्हाण, स्वा रा ती चे अधिष्ठाता डॉ शंकर धपाटे, वैद्यकीय अधिक्षक डॉ राकेश जाधव, मानसोपचार तज्ञ डॉ राजेश इंगोले व उद्धवबापू आपेगावकर अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आला.यावेळी ६३ जणांनी उत्स्फूर्तपणे रक्तदान केले. आमदार धनंजय मुंडे यांनी राज्यात विविध खात्यांचा पदभार सांभाळून राज्यात विविध विकासकारि, लोकोपयोगी तथा महत्वकांक्षी प्रकल्प यशस्वीपणे राबवून आपल्या कर्तृत्वाची छाप राज्यभर उमटवली आहे. धनंजय मुंडे यांनी आपल्या कामाच्या माध्यमातून त्यांच्या अनेक सहकाऱ्यांची फळी निर्माण केली आहे.

## सरोजनी देशपांडे यांच्या बहारदार गायनाने रसिक मंत्रमुग्ध

अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहरातील ''स्वररंग'' संगीत विद्यालयाच्या वतीने प्रख्यात गायिका सरोजिनी (राणीताई) देशपांडे (वडगावकर) यांच्या बहारदार गायनाने रसिक मंत्रमुग्ध झाले

गुरू पोर्णिमेनिमित्त्याने आयोजित गायन कार्यक्रमात त्यांनी जोग रागामधील मध्यलयीतील ख्याल साजन मोरे घर आये सादर केला.आकर्षक राग मांडणी विविध लयीतील आलाप व तानासह अत्यंत दमदार व खड्या आवाजात त्यांनी आपले गायन सादर केले. त्यांना तबला संगत रत्नदीप शिगे तर हार्मोनियम संगत प्रा.शैलेश पुराणिक यांनी केली प्रारंभी संगीत विद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी सरस्वती वंदना सादर केली नंतर कु.शताक्षी घायाळ हिने राग भिमपलास, कु.इरा कोदरकर हिने राग कल्याण, कु.अरिया पटेकर हिने राग दुर्गा, कु.स्वराली पुराणिक हिने राग बागेश्री,कु. वैभवी देशपांडे हिने राग असावरी, डॉ.संदीप जैन यांनी राग वृंदावनी सारंग, डॉ.नितीन पोतदार यांनी राग तिलक कामोद, वैजनाथ डिगे यांनी नारायण रमा रमणा हे नाट्यगीत व अबीर गुलाल हा अभंग गायिला त्यानंतर लहान मुलांनी चला हो पंढरी जाऊ हा संत तुकारामांचा अभंग सामूहिक रित्या सादर केला. कु.श्रावणी कुलकर्णी हिने राग जयजयवंती,मंजुषा देशमुख यांनी राग मिया मल्हार वैशाली विडेकर यांनी राग मुलतानी, सतीश भोसले यांनी ठाई ठाई विठ्ठल व टाळ बोली चिपळीला ही गीते सादर केली, अनंतराव मुळे यांनी राग कल्याण गायिला आशालता कलमे यांनी रघुपति राघव गजरी गजरी हे गीत गायिले, बळीराम उपाडे यांनी जब दीप जले आना हे गीत सादर केले.यशश्री गुट्टे हिने राग दरबारी कानडा गायला. भागवत पाठक बासरी वादन तर शैलेश पुराणिक यांनी जुगलबंदीतून राग देस सादर केला. प्रास्तविक शैलेष पुराणिक यांनी केले. कार्यक्रमाचे संचलन कु.यशश्री गुट्टे हिने आभार डॉ.पोतदार. निलेश मस्के,बंकट बैरागी यांनी तबला तर कु.इरा कोदरकर. व स्वराली पुराणिक हार्मोनियम साथ संगत केली.या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून अंबाजोगाईतील ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा कलावंत उल्हास पांडे संस्कार भारती अंबाजोगाई शाखा अध्यक्षा लताताई पत्की, प्रख्यात कलावंत सौ.सरोजिनीताई देशपांडे आदी मान्यवर उपस्थित होते.




## हर्षद दाते राज्यात शिष्यवृत्ती प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल सत्कार



म्हसोबावाडी । प्रतिनिधी

**वसुंधरा प्राथमिक विद्यालय येथील विद्यार्थी कुमार हर्षद सारिका प्रकाश दाते आठवी राज्यात शेवटी शिष्यवृत्ती २०२५ या वर्षात राज्यात शिष्यवृत्ती मध्ये रजत प्रथम क्रमांक मिळाल्याबद्दल जिजाऊ ब्रिगेडच्या वतीने बीड सांगवी महिला पदाधिकारी वतीने सन्मान सत्कार करण्यात आला आहे.**

हर्षद सारिका प्रकाश दाते यांचा यशाबद्दल आष्टी मतदारसंघाचे मतदारसंघाचे आमदार सुरेश धस आणा यांच्या सौभाग्यवती व प्राजक्ता ताई सुरेश धस. महानंदा दूध संघ संचलिका मुंबई. जिजाऊ ब्रिगेडच्या उपाध्यक्ष शिवमती सुवर्णा गिन्हे . बीड सांगवी जिजाऊ ब्रिगेड शाखा प्रमुख आशा मनोहर करांडे.बीडसागवी सरपंच शितल ताई नंदकिशोर करांडे.शोभा करांडे.रेखा कासवा.छाया पानतावणे. पद्मिनी नरोडे. सत्वशीला ससाणे.मगल साळवे.माया वावहळ इत्यादी महिला पदाधिकारी उपस्थित होते यावेळी हर्षद दाते आईचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान सत्कार करण्यात आला आहे.

## सफाई कामगारांचा अंबड पालिकेकडून सन्मान

अंबड । प्रतिनिधी

अंबड नगरपरिषद कार्यालय अंतर्गत नमस्ते दिन साजरा करण्यात आला यावेळी मुख्याधिकारी श्री मनोज उकिर्डे यांच्या हस्ते सफाई कामगारांचा सन्मान करून त्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले. केंद्रीय सामाजिक न्याय आणि अधिकारीता मंत्रालय व केंद्रीय गृहनिर्माण आणि शहरी व्यवहार मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या सहकार्याने नॅशनल ॲक्शन फॉर मॅकेनाइज्ड सॅनिटेशन इकोसिस्टम () योजना सुरू झाली आहे. सदर योजनेचा उद्देश सांडपाणी आणि सेप्टिक टँक कामगारांची () सुरक्षितता आणि प्रतिष्ठा सुनिश्चित करणे आणि स्वच्छता कामात शून्य मृत्यू साध्य करणे हा आहे. घनकचरा व्यवस्थापनात काम करणाऱ्या कचरा वेचकांनाही योजनेअंतर्गत अतिरिक्त घटक म्हणून समाविष्ट करण्यात आले आहे.नागरिकांसह लाभार्थ्यांमध्ये नमस्ते योजनेची जन जागृती करण्यासाठी सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये १६ जुलै, २०२५ रोजी नमस्ते दिन आयोजित करण्याचे तसेच सदर कार्यक्रमाची व्यापक प्रसिद्धी करण्याचे निर्देश वरिष्ठ आर्थिक सल्लागार सामाजिक न्याय व अधिकारीता मंत्रालय, नवी दिल्ली यांच्याकडून देण्यात आले होते, त्यानुषंगाने आज दि.१६ जुलै २०२५ वार-बुधवार रोजी नगर परिषद अंबड येथे मुख्याधिकारी तथा प्रशासक श्री. मनोज उकिर्डे यांच्या मार्गदर्शनाखाली आज नमस्ते दिन साजरा करण्यात आला व सफाई कामगार यांचा सन्मान करून त्यांना प्रमाणपत्र वाटप करण्यात आले यावेळी सफाई कामगार छायाबाई वैद्य, विनोद खरात, रवी शेवाळे, अभिषेक मगरे, दिलीप कारके, नामदेव शेवाळे, नाना पटेकर व ड्रेनेज कर्मचारी सुनील पारधे, सुरेश म्हस्के,यांना सन्मान प्रमाणपत्र देण्यात आले .यावेळी श्री. मनोज उकिर्डे(मुख्याधिकारी न. प अंबड), ज्ञानदेव गुट्टे (स्वच्छता अभियंता), अशोक लोंढे (स्वच्छता निरीक्षक), अमर खरात, परमेश्वर शिंदे, भारत जाधव, राहुल सोनवणे इ.कर्मचारी उपस्थित होते.



## थोडक्यात...



### धनंजय मुंडे यांच्या वाढदिवस निमित्त रुग्णालयात फळ वाटप

अंबड । प्रतिनिधी

राज्याचे मा कॅबिनेट मंत्री आमदार धनंजय भाऊ मुंडे यांच्या वाढदिवस निमित्तअंबड येथे उपजिल्हा रुग्णालयामध्ये उपचार घेत असलेले रुग्णाला फळे वाटप करण्यात आले. यावेळी फळ वाटप करताना श्री नारायण मुंडे, दीपक ठाकूर,विठ्ठलसिंग राणा, काकासाहेब कटारे, बाबुराव खरात, प्रल्हाद उगले, रमेश शहाणे, कमल दिघे (परिसेविका), संगीता शेजवलकर (आधिपरिचारिका), राहुल मुंडे, काशिनाथ शेवाळे, नवाज पटेल, रवी काळे, चंद्रकांत लाड, श्रीमंत खरात, सचिन घुगे, विशाल घुगे, अजिंक्य घुगे, यांच्यासह वैद्यकीय अधिकारी , कर्मचारी अधिकारी होते

### महानगरपालिकाकडून दिव्यांग व्यक्तीकडे दुर्लक्ष

जालना । प्रतिनिधी

जालना महानगरपालिका. आंदोलने उपोषणे. कागदोपत्रांचे पाठपुरावे करून सुद्धा जालना महानगर प्रशासन आयुक्त व अधिकारी बेघर दिव्यांगांकडे दुर्लक्ष करत आहेत. बेघर दिव्यांग व्यक्तीस दोनशे स्क्वेअर फिट स्वय रोजगारासाठी दिव्यांगांना जागा व दिव्यांग पुनर्वसन केंद्र. अशा दिव्यांगाच्या अनेक मागण्या अद्याप पर्यंत जालना महानगरपालिका प्रशासनाने दुर्लक्ष केले आहे तसेच दिव्यांग पुनर्वसन केंद्र. छत्रपती संभाजी महाराज उद्यान व समोरील मोतीबाग जागे शेजारील करण्यात यावे. तसेच दिव्यांगांच्या विविध मागण्या मंजूर न झाल्यास २२ जुलै २०२५ रोजी. शहरातील सर्व दिव्यांग अन्नत्याग उपोषणाला बसणार आहेत. असा गंभीर इशारा दिव्यांग संघटनेने दिला आहे. महानगरपालिकाने गंभीर्याने लक्ष देणे अशी मागणी शिवसेना दिव्यांग संघटक जालना जिल्हा अनिल मगदूले यांनी महानगरपालिकाला गंभीर इशारा दिला आहे .

### पाटोदयातील ५९ ग्रामपंचायतचे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील ५९ ग्रामपंचायतचे सरपंच पदाचे आरक्षण सन २०२५ ते २०३० मधील दि.१५ रोजी काढण्यात आले यावेळी अनुसूचित जाती साठी ६ पैकी अनुसूचित जाती ३ अनुसूचित जाती महिला.३ . ग्रामपंचायत तर. नामाप्रसाठी १६.पैकी नामाप्र ८.नामाप्र महिला ८ व सर्वसाधारण साठी. ३७ पैकी सर्वसाधारणसाठी.१८ तर.सर्वसाधारण महिला साठी १९ ग्रामपंचायतचे सरपंच पदाचे आरक्षण जाहीर करण्यात आले. पाटोदा तालुक्यातील ५९ ग्रामपंचायत चे सरपंच पदाचे आरक्षण याप्रमाणे अनुसूचित महिला काकडहिरा. भायाळा. करंजवन. अनुसूचित जाती पुरुष.कारेगाव चिखली.निरगुडी. ना.मा.प्र. उखंडा कोतन. पाचेगाव. जवळाला. पिंपळवंडी. पिठी. नफरवाडी. नाळवंडी. नामाप्र.महीला तळेपळगाव. सुप्पा. चुंबळी. लांबरवाडी. वडझरी. डोंगरकिन्ही. वैजाळा. पारनेर.तर सर्वसाधारण महिला पिंपळगाव धस.वहाली. सावरगाव सोने .वैद्यकीन्ही. वाघीरा. चिंचोली. पाचंग्री. सौताडा. रोहतवाडी. सोनेगाव /सौंदाना. अंमळनेर. बेनसुर.येवलवाडी.पा. मंझरी घाट. बेदरवाडी. ढाळेवाडी .गांधणवाडी.अनपटवाडी.तर सर्वसाधारण महासांगवी धनगरजवळका. पारगाव घुमरा .अंतापुर. थेरला. पांढरवाडी. मुगगाव.दासखेड.सावरगाव घाट.नायगाव. डोमरी. कुसळंब.तांबाराजुरी.खडकवाडी.येवलवाडी.स. गवळवाडी. निवडुंगा जाधववाडी असे जाहीर झाले आहेत यावेळी तहसिलदार दत्तात्रय निलावाड.नायब तहसीलदार अभय जोशी. गणेश दहीफळे.श्रीनिवास मुळे.निवडणुक विभागाचे नवनाथ घुमरे सर. संदिप जावळे.गोरक्षनाथ कोळपकर.सह आदी विविध गावचे मान्यवर उपस्थित होते.

### पाटोद्यात सेतु केंद्राची तपासणी, १२ केंद्र अस्तित्वातच नाहीत

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा तालुक्यातील असणारे आपले सरकार केंद्राची तपासणी नुकतीच तहसीलदार दत्तात्रय निलावाड नायब तहसीलदार सह आदीनी प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन केली असून या तपासणीस १२ आपले सरकार केंद्र आढळून आलेले नाहीत असा अहवाल त्यांनी जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे पाठवण्यात आला आहे. याबाबत अधिक माहिती अशी की सर्वसामान्य नागरिकांचे असणारे तहसील अंतर्गत येणारे सर्व कामे आपापल्या गावातच व्हावेत यासाठी शासनाने आपले सरकार केंद्र प्रत्येक गावात दिले असून मात्र तालुक्यामध्ये असे ५६ आपले सरकार केंद्र असून यामध्ये पाटोदा शहरात १६ कुसळंब .८ अंमळनेर.१० थेरला.१४ दासखेड ८ असे आपले सरकार केंद्र चालू असल्याचे रेकॉर्डला असून मात्र जिल्हाधिकारी बीड यांच्या आदेशानुसार पाटोदा तालुक्यामध्ये सेतू सुविधा केंद्र तहसीलदार दत्तात्रय निलावड नायब तहसीलदार अभय जोशी. मोरे. मुळे. सह आदीने प्रत्यक्ष जायमोक्यावर जाऊन या सेतु केंद्राची तपासणी केली असता यामध्ये १२ सेतू सुविधा केंद्र तपासणीच्या वेळी निदर्शनास आलेले नसून यामुळे या बारा ठिकाणी असणारे सेतु सुविधा केंद्राचा अहवाल जिल्हाधिकारी बीड यांच्याकडे पाठवण्यात आला असून यामुळे मात्र तालुक्यातील असणाऱ्या सेतु सुविधा केंद्रामध्ये खळबळ उडाली आहे.


## टी.सी.हरवला आहे

अंगद सदीपान फड या नावाचा इयत्तज्ञा १२ वी पासचा टीसी पिंपळनेर-बीड प्रवासात हरवला आहे. तरी सापडल्यास संपर्क साधावा.

-::संपर्क::-

मो.७६६६९२३२७५

## टी.सी.हरवला आहे

मोहिनी मधुकर सोनवणे रा. भाटसांगवी या नावाचा १२ वी विज्ञान पासचा टी.सी बीड ते भाटसांगवी प्रवासा दरम्यान हरवला आहे. कोणाला सापडल्यास खालील नंबर वर संपर्क साधावा.

-::संपर्क::-

मो.९३०७४२१४१३


## पान ६ वरून...

### घनकचरा व सांडपाणी

इंजिनीयर व उप अभियंता यांची सुनावणी २९ जुलै रोजी होणार आहे. प्रत्यक्षात येणाऱ्या अडचणी व त्यावर उपाययोजना करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी मार्गदर्शन केल्यामुळे प्रलंबित असलेल्या व अत्यंत शांत गतीने सुरू असलेल्या कामांना गती मिळणार आहे. या उपक्रमाचे सनियंत्रण करण्याची जबाबदारी संबंधित विस्तार अधिकारी तसेच गट व समूह समन्वय आणि संबंधित उपविभागाचे उपअभियंता तसेच कनिष्ठ अभियंता यांच्याकडे दिलेली आहे पुढील काळात यांच्याकडून प्रत्येक आठ दिवसाला कामांच्या प्रगती बाबत आढावा घेतला जाणार आहे.

### नारायण गड, गड नसून

राजकारण नको व्हायला पाहिजे या मुळे एका प्रकारे गडाची बदनामी होत आहे ही नको व्हायला पाहिजे,नको त्या चर्चा घडवून आपल्याच श्रद्धास्थान असलेल्या शक्तीपीठाची आपण कितपत श्रद्धा अबाधित ठेवत आहोत हा विचार केला पाहिजे , एकविचाराणे हा विषय मिटला तर गडावर भक्ती श्रद्धा असणाऱ्या भाविकांना वेगळी मनःशांती होईल

त्या साठी बीड जिल्ह्यातील संत महंतांनी पुढाकार घेवून समाजातील जुने जाणते ज्येष्ट मान्यवरांच्या उपस्थितीत एक सामूहिक बैठक घेत हा विषय लवकरात लवकर संपुष्टात आणून मिटवावा अशी आमच्या सारख्या हजारो भाविक भक्तांची आणि श्रध्दा असणाऱ्या तमाम जनांची अपेक्षा आहे जेवढ्या लवकर हा प्रश्न मिटेल तेवढ्या लवकर मिटवून घ्यावा व जनते समोर जाहीर करावा खर तर हा विषय हित पर्यंत यायलाच पाहिजे नको होता हा विषय एवढ्या मोठ्या प्रमाणात का लंबवण्यात आला हेच कळायला मार्ग नाही म्हणून यातून गडाची बदनामी होता कामा नये याची दक्षता घेत तत्काळ हा विषय संपवावा अशी कळकळीची भावना पत्रकाद्वारे गडाचे भक्त अविनाश नाईकवाडे ,महेश धांडे यांनी व्यक्त केली आहे

### प्रवीण गायकवाड यांच्यावर

संघटनेचे अनिल भाऊ घुमरे गणेश धोंडरे महादेव बहिर मराठा सेवा संघ विभागीय अध्यक्ष अशोक ठाकरे संगमेश्वर आंधळकर मराठा महा संघांचे बाप्पुसाहेब साळुंखे, काँग्रेस चे संभाजी जाधव आम आदमी पार्टीचे जिल्हाध्यक्ष अशोक येडे भारतीय कम्युनिस्ट पक्षाचे भाऊराव प्रभाळे ज्योतीराम हूरकुडे संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष महेंद्र मोरे भीम आर्मीचे आशिष कुमार चव्हाण निखिल सवयी रानबा उजगरे ज्ञानेश्वर कवठेकर सिद्धार्थ शिंगारे भागवत मस्के जय हिंद संघटनेचे रमेश सानप किशोर पिसाळ बाळासाहेब घुमरे नितीन पिसाळ अनेक पदाधिकारी कार्यकर्ते यावेळी उपस्थित होते.

### हिंदू मुस्लिम एकतेचे

त्यानंतर भाविकांना प्रसादाचे वाटप करण्यात येते.त्यानंतर संध्याकाळी छबीना मिरवणूक काढली जाते.यामध्ये गावातील सर्व जाती धर्मातील लोकं तरुण मोठ्या संख्येने उपस्थित असतात. सामाजिक धार्मिक कार्यात नेहमी अग्रेसर असणारे सिध्दार्थ भानुदास भादवे यांनी स्वखर्चाने दर्गा परिसरात पत्र्याच्या शेडच काम केले असून त्यांच्या या कार्यामुळे सामाजिक एकतेचा चांगला संदेश गेला आहे.

### ध्येय साध्य करण्यासाठी स्वप्ने

वापर करून शिक्षणाचा दर्जा वाढवण्यात येईल.या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना अधिक चांगली शिक्षणसुविधा मिळेल आणि त्यांचा सर्वांगीण विकास होईल. शाळेच्या भविष्यकाळासाठी महत्त्वाकांक्षी योजना आखण्यात आल्या आहेत.सर्व उपस्थितांनी शाळेच्या भविष्यकाळासाठी शुभेच्छा दिल्या आणि या उत्सवाचा आनंद घेतला. यावेळी शाळेमध्ये दहा वर्ष पूर्ण केलेल्या विठ्ठल आगे, जयश्री भगस आणि किष्किंधा गायकवाड या कर्मचाऱ्यांचा बक्षीस देऊन सन्मान करण्यात आला. याप्रसंगी शाळेच्या समन्वयक नीला देशमुख,उपप्राचार्य राहुल कदम, विद्यार्थी प्रतिनिधी आदिल शहा, सानिका सोळंके, सर्व शिक्षक,पालक व शिक्षकेत्तर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमांचे प्रास्ताविक डॉ.वरुणराज तौर यांनी तर सूत्रसंचालन शाळेचे इयत्ता आठवी वर्गातील विद्यार्थी कुमार कैवल्य सोळंके व कुमारी विद्यार्थिनी वेदिका गवते यांनी केले तर आभार हरीभाऊ सोळंके यांनी केले.

### मोफत त्वचारोग शिबिरात

हा प्रकार थांबविण्यासाठी ही या जनजागृतीपर उपक्रमासह मोफत शिबीर व औषधोपचार उपक्रमाची मदत होणार असल्याचे ही डॉ.मुळे यांनी सांगितले. चुकीचे क्रिम वापरल्याने त्वचा पातळ होणे (शोष), स्ट्रेच मार्क्स, रोसेसिया, पुरळ, पेरीओरलसह इतरही गंभीर समस्या उद्भवण्याचा धोका असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. हल्ली स्वयंघोषित, बोगस त्वचारोग तज्ज्ञांचा सुळसुळाट झाला असल्याचे सर्वत्र बोलल्या जात आहे. जाहिरातीत हे तथाकथित व्यक्ती सर्रास त्वचारोग बरा करण्याशी संबंधित दावा करतात. परंतु, त्यांच्याकडे त्वचारोग तज्ज्ञांसाठी आवश्यक असलेली शैक्षणिक अर्हताही नाही. देशात अशा खोट्या, फसव्या जाहिरातींवर प्रतिबंध घालणारा कायदा नसल्यानेच हे होत असावे. परंतु, हा प्रकार म्हणजे सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्याशी खेळणे आहे. त्यामुळे या विषयाकडे गांभिर्याने बघण्याची गरज असल्याचेही डॉ.जिगिषा मुळे यांनी सांगून योग्य त्वचा रोग तज्ज्ञ कसे ओळखावेत. त्यांच्याकडूनच त्वचा विकारांवर उपचार करावेत. त्याचे फायदे. तर बोगस स्वयंघोषित कॉस्मेटोलॉजिस्ट यांच्याकडून उपचार केल्यास होणारे दुष्परिणाम या बाबतची माहिती आणि योग्य सल्ला या मोफत निदान व शिबिरांतून १२७ गरजू रूग्णांना देण्यात आला.

राज्य लोकतंत्र
शेत-शिवार
गुरूवार दि. १७ जुलै २०२५
४

# टोमॅटोच्या दरात झाली मोठी वाढ

## पावसा अभावी भाज्यांचे दर कडाडले: अवक देखील घटली

देशाची राजधानी दिल्लीत हिरव्या भाज्यांच्या किंमतीत मोठी वाढ होताना दिसून येत आहे. बाजारात हिरव्या भाज्यांचे विविध प्रकार आहे. या भाज्यांच्या दरात ३० टक्क्यांवरुन १२० ते १६० टक्क्यांपर्यंत वाढ झाली आहे. त्याचबरोबर फुलकोबीचा भावही अवघ्या पंधरा दिवसांत १६० रुपयांपर्यंत वाढला आहे. तसेच टोमॅटोपासून ते लिंबूपर्यंतच्या दरातही वाढ झाली आहे. एका बाजूला ग्राहकांना फटका बसत असताना दुसऱ्या बाजूला बळीराजाला फायदा होत आहे. जूनमध्ये २० रुपये किलोने विकला जाणारा टोमॅटोची लाली आता वाढली आहे. तो पूर्वीपेक्षा दुप्पट भावाने म्हणजेच बाजारात ५० ते ६० रुपये किलोने विकला जात आहे. राष्ट्रीय राजधानी दिल्लीच्या आझादपूर मंडीसह इतर लहान बाजारपेठांमध्ये त्यांची आवक कमी झाली आहे. पावसामुळे कर्नाटकहून उत्तराखंड आणि हिमाचल प्रदेशात होणाऱ्या भाज्यांचा पुरवठा खंडित झाल्यामुळे त्याचे भाव ३० टक्क्यांवरून १४० ते १५० टक्क्यांपर्यंत वाढले आहेत.

भाज्यांचे भाव किती वाढले ?

हिरव्या भाज्यांमध्ये किमतीत सर्वात मोठी वाढ



दिसून येत आहे. बाजारात हिरव्या भाज्यांचे दर वाढले आहेत. भाज्यांचा दर हा १२० ते १६० रुपये किलो आहे. फुलकोबीचा भावही अवघ्या पंधरा दिवसांत १६० रुपये किलोने वाढला आहे. याशिवाय, दुधी भोपळा, भेंडी, भोपळा आणि कोबीच्या किमतीही सुमारे पन्नास टक्क्यांनी वाढल्या आहेत. बाजारात काम करणाऱ्या भाजीपाला व्यापाऱ्यांवर विश्वास ठेवला तर, आझादपूर बाजारपेठेत वाढलेल्या किमतीमागील सर्वात मोठे कारण म्हणजे टोमॅटो आणि हिरव्या भाज्यांच्या आवकवर झालेला परिणाम. त्यांचे म्हणणे आहे की उत्तराखंडमध्ये झालेल्या मुसळधार पावसामुळे भाज्यांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.

भाज्यांच्या पुरवठ्यावर पावसाचा प्रभाव

टोमॅटो आणि सिमला मिरची आणि इतर भाज्या कर्नाटकातून राष्ट्रीय राजधानी दिल्लीत पोहोचत असताना, टोमॅटो, कोबी, मदर हिमाचल प्रदेशातून पुरवले जातात. याशिवाय, उत्तराखंडमधून फुलकोबी, कुंद्री, हिरव्या मिरच्या आणि वाटाणे मोठ्या प्रमाणात पुरवले जातात. परंतु पावसामुळे या भाज्यांचा पुरवठा मोठ्या प्रमाणात विस्कळीत झाला आहे. गेल्या काही दिवसापासून देशाच्या विविध भागात जोरदार पाऊस कोसळताना दिसत आहे. या पावसाचा शेती पिकांवर मोठा परिणाम होताना दिसत आहे. परिणामी शेती पिकांच्या उत्पादनात मोठी घट येत आहे. यामुळं मागणीपेक्षा पुरवठा कमी झाल्यामुळं दरात वाढ होत असल्याचे दिसत आहे.

## फळमाशी नियंत्रणाची संपूर्ण माहिती

फळमाशी ही सध्याला भारतामध्ये नव्हे तर संपूर्ण जगामध्ये एक प्रमुख कीड झाली आहे. संपूर्ण जगामध्ये फळमाशीच्या ४५०० हून अधिक प्रजाती आढळतात. भारतामध्ये सुमारे २०० हून अधिक जाती आहेत. आणि त्यातील ५ ते ६ प्रजाती या थेट पिकाला नुकसान पोहचवत असतात. जर आपण वेळीच या फळमाशीचे नियंत्रण नाही केले तर जवळ-जवळ २० ते ३० %पिकाचे नुकसान होऊ शकते.

फळमाशी कोणत्या पिकावर येते? : फळमाशी चा प्रादुर्भाव हा पेरू, आंबा, चिकू, द्राक्ष, अंजीर, डाळिंब, बोर, लिंबूवर्गीय फळे अशा फळांवर तर कलिंगड, दोडकी, काकडी, भोपळा, घोसाळी, तोंडली, कारली, पडवळ इ. वेलवर्गीय फळभाज्यावर होऊ शकतो.

फळमाशीचा जीवनक्रम : फळमाशी ही आकारणे लहान असते. तिची लांबी ही ७ मिमी इतकी असते. आपल्या घर माशी एवढीच ही देखील माशी असते. फळमाशीच्या एकूण ४ अवस्था असतात अंडी, अळी, कोष आणि माशी. फळमाशी ची मादी सुरुवातीला फळामध्ये अंडी घालते. एका छिद्रामध्ये १ ते १५ अंडी असू शकतात. फळमाशी तिच्या पूर्ण जीवनक्रमामध्ये ५०० ते १५०० अंडी घालते. ही अंडी पांढऱ्या रंगाची आणि १ मिमी लांबीची असतात. ही अंडी १ आठवड्यात उबतात. आणि त्यामधून पिवळ्या रंगाच्या आळ्या बाहेर पडतात. या आळ्या पूर्ण वाढीसाठी १ ते ३ आठवडे घेतात. पूर्ण वाढ झालेल्या आळ्या फळातून बाहेर येऊन जमिनीमध्ये ५ ते १५ सेंटीमीटर खोलीवर जाऊन कोश अवस्थेमध्ये जातात. कोश अवस्था ही १ आठवडा ते ४० दिवसांची असू शकते. पूर्ण वाढ झालेल्या कोशामधून माशा बाहेर पडतात व त्या पुन्हा फळामध्ये अंडी घालतात. ही माशी पुढे जाऊन ३ ते ४ महीने जगते. अशा प्रकारे एका वर्षामध्ये फळमाशीच्या ९ ते १० पिढ्या पूर्ण होतात.

भारतामध्ये प्रामुख्याने आढळणाऱ्या फळमाशा : फळमाशी पिके, बॅक्ट्रोसेरा डॉरसॅलिस, बॅक्ट्रोसेरा झोनाटा, बॅक्ट्रोसेरा करेक्टा, बॅक्ट्रोसेरा कुकुरबीटी.

फळमाशी मुळे होणारे नुकसान : फळमाशी च्या आळ्या फळामधील गर खातात व परिणामी फळाची गुणवत्ता खालावते. फळे पिवळी पडतात व पुढे जाणून ती सुकून खाली पडतात. फळमाशी ने फळावर केलेल्या छिद्रामुळे फळामध्ये इतर बुरशीचा शिरकाव होतो व अशी फळे सडू लागतात. फळे वेडी वाकडी होतात. फळांची वाढ खुंटते.

फळमाशी नियंत्रणसाठी उपाययोजना : उन्हाळ्यामध्ये जमीन चांगली नांगरून घ्यावी व जमीन उन्हामध्ये टापू द्यावी. असे केल्यामुळे मातीमधील फळमाशीच्या सुप्त अवस्था नष्ट होतात. बागेतील कीड ग्रस्त सर्व फळे गोळा करून नष्ट करावीत. फळमाशी चा प्रादुर्भाव हा पक्क फळावर जास्त होतो. त्यामुळे फळे पिकण्यापूर्वी त्यांची काढणी करावी. फळमाशीचे नर कंट्रोल करण्यासाठी कामगंध सापळ्यांचा वापर करावा.



# जनावरांच्या आरोग्यासाठी खरारा आवश्यक



पशू व्यवस्थापनामध्ये खरारा (ग्रूमिंग) हा एक महत्त्वाचा भाग आहे. खरारा केल्याने जनावरांचे आरोग्य चांगले राहाते. त्यांच्या मानसिकतेवर चांगला परिणाम होतो. नियमित खरारा, कातडीची देखभाल, खुरांची काळजी आणि बाह्य परजीवींचे व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. यातील प्रत्येक पद्धती ही आजाराचा प्रसार रोखण्यासाठी महत्त्वाची आहे. यामुळे जनावरे शारीरिकदृष्ट्या मजबूत आणि उत्पादन सक्षम राखण्यास मदत होते. बंदिस्त गोठे हे रोगप्रसारक आणि परजीवींच्या उत्पतीचे कारण आहे. त्यामुळे नियमित आणि वारंवार खरारा आवश्यक ठरतो.

खरारा केल्याने नियमित त्वचेची स्थिती, जखमा किंवा आजाराची चिन्हे लवकर शोधण्यात मदत होते. त्वरित उपचार करता येतात. संसर्गाचा धोका कमी करते. रक्ताभिसरण आणि त्वचेच्या आरोग्याला चालना मिळते, खरारा करताना पशू आणि मालकामध्ये परस्परसंवाद होतो. यामुळे तणावाची पातळी कमी होऊन जनावरे शांत आणि निश्चल होतात. सातत्यपूर्ण संवादांद्वारे पालकांचे पशूंसोबतचे नाते अधिक दृढ होते. त्यामुळे जनावरांची हाताळणी आणि तपासणी प्रक्रिया सुलभ घडते. आरोग्य सेवा, आजार नियंत्रण आणि पशूंच्या वर्तणुकीशी संवर्धन यांचे एकत्रीकरण म्हणून खरारा महत्त्वाचा आहे.

जनावरांमध्ये परजीवींचा प्रादुर्भाव रोखणे हे जनावराचे आरोग्य योग्य राखण्यात महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. परजीवी म्हणजे जंत आणि बाह्य कीटक जसे की गोचीड, गोमाशी, पिसवा आणि उवा यांचा समावेश होतो. परजीवींच्या प्रादुर्भावामुळे जनावर अस्वस्थ राहते. कुपोषण, अशक्तपणा आणि आजाराच्या समस्या दिसतात. रोगप्रतिकारक शक्ती कमकुवत होते. हे लक्षात घेऊन परजीवी निर्मूलन, जंतनाशकांचा वापर आवश्यक आहे. याचबरोबरीने खरारा करणे हा प्रतिबंधात्मक उपाय महत्त्वाचा आहे. बाह्य परजीवींचा त्रास कमी होतो. याचबरोबरीने गोठ्यांची स्वच्छता करणे महत्त्वाचे ठरते. दाट केस किंवा लोकरीमध्ये वाढणारे जीव तयार होण्यापासून रोखण्यासाठी लोकर कातरणे आवश्यक ठरते. परजीवी प्रादुर्भाव रोखण्यासाठी चराई क्षेत्र व्यवस्थापन महत्त्वाचे आहे. चराईच्या क्षेत्र बदलामुळे मातीत जन्मलेल्या परजीवींचा भार कमी होतो, ज्यामुळे जनावरे चरताना प्रादुर्भावाचा धोका कमी होतो. स्वच्छ पाणी आणि योग्य स्वच्छता सुनिश्चित केल्याने परजीवींचा प्रसार रोखता येतो. परजीवी समस्या लवकर शोधण्यासाठी आणि उपचारांसाठी निरीक्षण आवश्यक आहे. नियमित विष्ठा तपासणीअंतर्गत परजीवी ओळखण्यात मदत होते. शारीरिक तपासणीमुळे बाह्य कीटकांचा प्रादुर्भाव लक्षात येतो. त्यांचा प्रसार होण्यापासून आणि कळपाच्या किंवा कळपाच्या एकूण आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणाम रोखण्यात मदत होते.

खरारा करण्याचे फायदे : खरारा केल्यामुळे जनावरांच्या शरीरावरील परजीवी, घाण निघून जाते. संक्रमण नियंत्रणात येते. रक्ताभिसरण आणि त्वचेचे आरोग्य सुधारते, कातडी चमकदार होते. त्वचा आजारांचे नियंत्रण होते. रोगजनकांचा मानव आणि इतर प्रजातींमध्ये प्रसार रोखता येतो. खरारा केल्याने संपूर्ण त्वचेमध्ये नैसर्गिक तेल प्रसारित होण्यास मदत होते, ज्यामुळे चमक आणि गुणवत्ता सुधारते. विशेषत: लांब केस असलेल्या प्राण्यांमध्ये केसांचा गुंता टाळता येतो. मेंढ्या आणि ससा यांच्या विशिष्ट जाती लोकर किंवा फरसाठी वाढविल्या जातात. त्यांच्यामध्ये खरारा केल्यामुळे गुणवत्ता चांगली राहते. जाड कातडी असलेल्या जनावरांमध्ये उष्णतेच्या ताणापासून बचाव करण्यासाठी खरारा महत्त्वाचा आहे. जास्तीचे केस काढून टाकून किंवा मेंढ्यांमध्ये जाड लोकरीची कापणी महत्त्वाची ठरते. शरीराचे तापमान अधिक प्रभावीपणे नियंत्रित करण्यात मदत होते, त्यामुळे उष्ण हवामानात उष्णतेशी संबंधित आजारांचा धोका कमी होतो.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१४८९ : निजाम खान यांची सिकंदर शाह द्वितीय यांच्या नावाने दिल्लीचे सुल्तान म्हणून घोषित करण्यात आलं.

१८०२ : मोडी लिपीतून पहिल्यांदाच मुद्रण करण्यात आले.

१८१९ : 'अॅडॅम्स-ओनिस' करारानुसार फ्लोरिडा हे राज्य अमेरिकेने स्पेनकडुन ५ दशलक्ष डॉलर देऊन विकत घेतले.

१८४१ : अतिशय गाजलेल्या 'पंच' या विनोदी साप्ताहिकाचा पहिला अंक प्रकाशित झाला.

१९१७ : किंग जॉर्ज (पाचवा) यांनी फतवा काढून जाहीर केले की त्यांच्या वंशातील पुरुष मंडळी 'विंडसर' हे आडनाव लावतील.

१९४७ : मुंबई ते रेवस अशी जलवाहतुक करणार्या 'रामदास' या फेरीबोटीला गटारी अमावस्येच्या रात्री 'काशाचा खडक' या ठिकाणाजवळ जलसमाधी मिळुन सुमारे ७०० लोक मृत्यूमुखी पडले.

१९५० : देशांतील पहिली विमान दुर्घटना पंजाब राज्यातील पठाणकोट येथे घडून आली.

१९५३ : अमेरिकन व्यंग चित्रकार व लेखक वॉल्ट डिज़्नी यांनी अमेरिकेतील अॅनाहेम, कॅलिफोर्निया या दोन ठिकाणी 'डिस्नेलँड' सुरू केले.

१९५५ : वॉल्ट डिस्ने यांनी अॅनाहेम, कॅलिफोर्निया येथे 'डिस्नेलँड' सुरू केले.

१९७५ : अमेरिकेचे अपोलो रशियाचे सोयुझ ही दोन अंतराळयाने एकमेकांस जोडली गेली.

१९७६ : कॅनडातील मॉन्ट्रिअल येथे २१ व्या ऑलिम्पिक स्पर्धांना सुरुवात झाली.

१९९३ : तेलगू भाषेतील प्रतिष्ठेचा मानला जाणारा 'तेलगू थल्ली' हा सर्वोच्च पुरस्कार ज्येष्ठ विचारवंत तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यांना प्रदान

१९९४ : विश्वकप फूटबॉलच्या अंतिम सामन्यात ब्राझिलने इटालीला पेनल्टी शूटआऊटमधे हरवले.

२००० : अभिनेत्री व नृत्यांगना वैजयंतीमाला बाली यांना'भरतनाट्य शिखरमणी' पुरस्कार जाहीर

२००४ : तामिळनाडुतील कुंभकोणम गावात एका शाळेला लागलेल्या आगीत ९० विद्यार्थी मृत्यूमुखी पडले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८८९ : अर्ल स्टॅनले गार्डनर अमेरिकन लेखक आणि वकील (मृत्यू: ११ मार्च १९७०)

१९१७ : भारतीय अभिनेते, गायक आणि पटकथालेखक बिजोन भट्टाचार्य यांचा जन्म. (मृत्यू: १९ जानेवारी १९७८)

१९१८ : ग्वाटेमालाचा राष्ट्राध्यक्ष कार्लोसमनुएल अराना ओसोरिया यांचा जन्म.

१९१९ : स्नेहल भाटकर संगीतकार (मृत्यू: २९ मे २००७)

१९२३ : कूपर कार कंपनी चे सहसंस्थापक जॉन कूपर यांचा जन्म. (मृत्यू: २४ डिसेंबर २०००)

१९३०: बाबुराव बागूल दलित साहित्यिक (मृत्यू: २६ मार्च २००८)

१९५४ : अँजेला मेर्केल जर्मनीच्या चॅन्सेलर

१९५९ : भारतीय हिंदी आणि मल्याळम चित्रपट अभिनेत्री जरीना वहाब यांचा जन्मदिन.

१९६९ : भारतीय हिंदी आणि भोजपुरी चित्रपट अभिनेता रवी किशन यांचा जन्मदिन.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७९० : अॅडॅम स्मिथ स्कॉटिश अर्थशास्त्रज्ञ आणि तत्त्ववेत्ता (जन्म: ५ जून १७२३)

१८३५ : मेघालय सम्राट तिरोट सिंग यांचे निधन.

१९२८ : भारताच्या ज्येष्ठ समाजवादी नेत्या आणि भारतीय संसदेच्या सदस्या मृणाल गोरे यांचे निधन.

१९७२ : गुजरात राज्यातील प्रसिद्ध राजकारणी आणि 'अखिल भारतीय किसान सभे'चे नेते, इंदुलाल याज्ञिक यांचे निधन.

१९९२ : काननदेवी बंगाली व हिंदी चित्रपटातील अभिनेत्री व गायिका १९३० ते १९५० (जन्म: २२ एप्रिल १९१६)

१९९२ : शांता हुबळीकर प्रभातच्या 'माणूस' चित्रपटामुळे गाजलेल्या अभिनेत्री, पुणे महापालिकेतर्फे 'बालगंधर्व पुरस्कार' (जन्म: १४ एप्रिल १९१४)

२००५ : युनायटेड किंगडमचे पंतप्रधान सर एडवर्ड हीथ यांचे निधन.

२०१२ : मृणाल गोरे समाजवादी नेत्या आणि ६ व्या लोकसभेच्या सदस्य (जन्म: २४ जून १९२८)

२०१२ : भारतीय-इंग्रजी राजकारणी मार्शा सिंह यांचे निधन. (जन्म: ११ ऑक्टोबर १९५४)

२०२० : सी.एस. शेषाद्री भारतीय गणितज्ञ व चेन्नई मॅथेमॅटिकल इन्स्टिट्यूटचे संस्थापक पद्म भूषण, शांती स्वरूप भटनागर पुरस्कार (जन्म: २९ फेब्रुवारी १९३२)

# कांदा दुभाळणे किंवा जोड कांदा होण्यामागची कारणे व उपाय


सध्या बरेच शेतकरी कांदा पीक लागवडीकडे वळले आहेत. त्यामधून त्यांना अपेक्षित असे उत्पन्नही मिळत आहे. परंतू अनेक शेतकऱ्यांची समस्या राहिलेली आहे की त्यांच्या कांदा प्लॉटमध्ये दुभाळका किंवा जोडकांदा तयार होत आहे. म्हणजेच एकाच कांद्यापासून दोन कांदे तयार होत आहेत. जोड कांद्याला बरेच ठिकाणी बेळा कांदा असे म्हणतात. आपल्यापैकी बरेच शेतकऱ्यांना ही गोष्ट माहित नाही की दुभळका किंवा जोडकांदा का तयार होतो आणि तो कांदा तयार होऊ नये म्हणून काय उपाययोजना कराव्यात. याबाबत माहिती घेतल्यास उपाय करता येतात.

दुभाळका किंवा जोड कांदा तयार होण्याची कारणे : अ) खतांचा अतिरेक - बरेच शेतकरी कांद्याचे जास्त उत्पादन मिळेल या गैरसमजातून जास्त रासायनिक खत टाकतात. कांद्याचे खत व्यवस्थापन करताना जास्त प्रमाणात शेतकऱ्याकडून जर पोटॅश युक्त खतांचा अतिरिक्त वापर जास्त झाला तर पोग्यामधून डबल कोंब बाहेर येतो. आणि कांद्याचे दोन भाग होऊन जोड कांदा तयार होऊ शकतो. ब) अतिरिक्त पाण्याचा वापर - दुभळका किंवा जोड कांदा तयार होण्यामध्ये अतिरिक्त पाण्याचा वापर हे एक प्रमुख कारण आहे. शेतकरी बांधवांनो तुम्ही जर कांदा लागवड करताना योग्य प्रमाणात आणि वेळोवेळी पाणी न देता कांद्याला जास्त पाणी दिले तर आपल्याला कांद्याची पात तर हिरवीगार झालेली दिसते पण यामुळेच जोड कांदा देखील तयार होऊ शकतो. क) गुणवत्तापूर्ण बियाण्यांचा अभाव : प्रत्येक शेतकरी स्वतःसाठी काहीना काही प्रमाणात कांद्याची बी साठवून ठेवत असतो. परंतु नंजर चुकीने शेतकऱ्यांकडून जोडकांद्याचे बियाणे तयार झाले आणि ते पेरणीसाठी वापरण्यात आले तर जोड कांदा तयार होऊ होतो. ड) पोषक फवारणी : कांदा पिकामध्ये फवारणी करताना आपण विविध संजीवके फवारणीसाठी वापरतो. आणि याच फवारणीमध्ये आपण जर पोटॅशियमचा वापर जास्त प्रमाणात केला तर दुभाळका किंवा जोड कांदा तयार होतो.

जोडकांदा तयार होऊ नये म्हणून उपाययोजनाः अ) खत व्यवस्थापन - कृषी विद्यापीठाच्या शिफारशीनुसार जे खत वापरायला सांगितले आहे त्याच खतांचा वापर शेतकऱ्यांनी करायला पाहिजे. कोणत्याही खताचा अतिरिक्त वापर न करता नत्र, स्फुरद व पालाश यांचे प्रमाण प्रति हेक्टरी १००:५०:५० किलो प्रमाणात घेऊन वापरावे. मिश्र खतांमध्ये आपण पोटॅशियम वापरले पाहिजे. वेगळे पोटॅश वापरण्याची गरज नाही. तसेच आपण कांदा लागवड केल्यानंतर बोरॉन चा वापर करणे अत्यंत गरजेचे आहे. त्यामुळे कांद्याला क्रॅक जात नाही आणि जोड कांदा तयार होत नाही.

ब) योग्य पाणी व्यवस्थापन - कांदा लागवड केल्यानंतर साधारणता ११० ते १२० दिवसांमध्ये कांदा काढायला येतो. त्यासाठी पाण्याचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. कांद्याला शेवटचे पाणी ९० दिवसांपर्यंत द्यावे त्यानंतर पाणी देऊ नये. जर पाणी योग्य प्रमाणात दिले नाही किंवा जास्त प्रमाणात पाणी दिले तर कांद्याला क्रॅक जाऊन जोड कांदा तयार होतो.

क) गुणवत्ता पूर्ण बियाणांचा वापर - कांदा लागवड करताना कंपनीचे बियाणे वापरणे खूप गरजेचे असते. कारण त्या बियाण्यांची निवड टेस्टिंगद्वारे केलेली असते. घरगुती बियाणे वापर केल्यास आपल्याला जोडकांदा बियाणे झालेले असल्यास समजत नाही. आणि अशी बियाणे वापरल्यास जोड कांदा तयार होतो व उत्पादनात घट येते.



# निवडणुकीत दिलेल्या प्रत्येक आश्वासनांची पूर्ती करणार!-आ.अर्जुनराव खोतकर

जालना। प्रतिनिधी

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत जालना विधानसभा मतदारसंघात जिल्ह्यातील सर्वाधिक म्हणजे एकूण १२ हजार २०७ घरकुलांना मंजुरी मिळविली आहे. मागील दोन वर्षात १८३८ घरकुले पूर्ण झाली असून घरकुलांचा निधी लाभार्थींच्या थेट खात्यावर वितरितही झाला आहे. बेघर तसेच कच्ची घरी असलेल्या सर्वसामान्य कुटुंबासाठी इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुलांना मंजुरी आणल्याचा मला विशेष आनंद आणि समाधान असल्याचे माजी राज्यमंत्री, आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सांगितले.

आमदार खोतकर यांनी म्हटले आहे की, विधानसभा निवडणुकीत दिलेल्या आश्वासनांची पूर्तता करणे हेच आपले ध्येय आहे. जालना शहरात सुमारे ३०० कोटींची कामे सुरू आहेत. रस्ते, नाल्या, सभागृह, संरक्षण भिंत,चौक आणि ओपन स्पेस सुशोभीकरण अशा विविध प्रकारच्या कामांचा त्यात समावेश आहे. देवी, गणपती, छटपूजा अशा मूर्ती विसर्जनासाठी मोती तलाव येथे (संभाजी तलाव) ११ कोटी रुपये खर्चून विशेष व्यवस्था करण्यात येत आहे. अंबड येथील फिल्टर प्लांटचे तसेच शहरातील पाण्याच्या टाक्यांचे काम प्रगतीपथावर आहे. सौर ऊर्जा प्रकल्पही (घाणेवाडी



तलावनजीक) लवकरच कार्यान्वित होईल. आणि दिवाळीनंतर जालनेकरांना दररोज अथवा दिवसाआड पाणीपुरवठा करण्याचे स्वप्नदेखील होणार आहे. माझ्या जालना विधानसभा मतदारसंघातील ६२ गावांमध्ये एकूण बारा हजार २०७ घरकुलांना आपण मंजुरी मिळविली आहे. ही योजना केंद्र पुरस्कृत ६० टक्के आणि राज्य पुरस्कृत ४०% अशा स्वरूपात आहे. मंजूर घरकुलांमध्ये ८८२५ केंद्रपुरस्कृत आणि ३३८२ राज्य पुरस्कृत आहेत. २०२४_२५ आणि २५ २६ या वर्षात १८३८ घरकुले पूर्ण झाली आहेत. मंजूर घरकुलांची कामेही प्रगतीपथावर आहेत. आपण निवडणुकीत घरकुलांचा शब्द दिला होता. बेघर आणि गोरगरिबांसाठी इतक्या मोठ्या प्रमाणात घरकुले मंजूर करून आणल्याचे समाधान आणि विशेष आनंद वाटतो असेही आमदार खोतकर यांनी आवर्जून म्हटले आहे. आपल्या कारकिर्दीत जालना शहर आणि ग्रामीण भागाचा चेहरामोहरा बदललेला दिसेल. निवडणुकीत दिलेल्या प्रत्येक आश्वासनांची पूर्ती करणे याच ध्येयाने आपण अहोरात्र कामाला लागलो असल्याचे आमदार खोतकर यांनी स्पष्ट केले. शहरातील प्रत्येक वार्डात सुरू असलेल्या विकास कामांमुळे नागरिकांतूनही आपल्याला समाधानकारक प्रतिक्रिया ऐकायला मिळत आहेत.

## भालदारपुरा येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिर

### शिबिरात २५० विद्यार्थी आणि ८० मातांची झाली आरोग्य तपासणी



बीड। प्रतिनिधी

जिल्ह्यातील ख्यातनाम शिक्षण संस्था अंजुमन ईशात-ए-तालीम च्या भालदार पुरा येथील मिल्लीया प्राथमिक शाळा (मुलींची) येथे विद्यार्थी व मातांसाठी मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरात २५० विद्यार्थी आणि ८० मातांची आरोग्य तपासणी करण्यात आली.

भालदार पुरा येथील मिल्लीया प्राथमिक शाळेत मंगळवार दिनांक १५ जुलै २०२५ रोजी सकाळी १०००: ते दुपारी १००: वाजेपर्यंत हे आरोग्य तपासणी शिबिर घेण्यात आले. या शिबिराचा विद्यार्थ्यांसह मातांनीही मोठ्या प्रमाणात लाभ घेतला. आरोग्य तपासणी शिबिरात मातांची तपासणी शहरातील सुप्रसिद्ध गायनॅकॉलॉजिस्ट डॉ. रेश्मा पठाण यांनी केली. तर विद्यार्थ्यांची तपासणी डॉ. मसरत जहाँ खादरी यांनी केली. विशेष म्हणजे या शिबिरासाठी दोन्ही डॉक्टर्सनी कुठलेही शुल्क न आकारता विनामूल्य सेवा दिली. आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन अंजुमन ईशात-ए-तालीम संस्थेच्या सचिव खान सबिहा बेगम बाजी यांच्या मार्गदर्शनाखाली मुख्याध्यापिका मिर्झा कनिज़ फातेमा आणि पर्यवेक्षिका रिज़वाना बेगम कादरी यांनी केले. हे आरोग्य शिबिर यशस्वी करण्यासाठी हाजरा बाजी, सबीया खतीब बाजी, मसरत बाजी, निशात बाजी, शाज़ीया बाजी, नजमुसहेर बाजी, सना बाजी, अरशीया बाजी, तसलीम बाजी, सबा फातेमा बाजी, सबा अंजुम बाजी यांच्यासह शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांनीही परिश्रम घेतले.

## वृक्षांची जोपासणा करत ग्रीन परळीचे स्वप्न साकार करा-उमा समशेट्टे

### वृक्ष लागवड पंधरवड्या अंतर्गत उपक्रम



परळी। प्रतिनिधी

वृक्ष लागवडीनंतर त्या वृक्षांची योग्य जोपासणा झाली तरच ग्रीन परळीचे स्वप्न साकार होईल असा विश्वास भाजपाच्या शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांनी व्यक्त केला.राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसानिमित्त शहरात भाजपच्या वतीने ११ ते २६ जूलै दरम्यान सुरु अषलेल्या वृक्ष लागवड पंधरवड्यात बुधवार दि.१६ जुलै रोजी माणिकनगर भागात कल्याणकारी हनुमान मंदिर परिसरात वृक्षलागवड करण्यात आली.भाजपचे पदाधिकारी, कार्यकर्ते सहभागी झाले होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून एक पेड माँ के नाम या अभियानांतर्गत पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने भाजपतर्फे हा वृक्ष लागवड पंधरवडा साजरा करण्यात येत आहे.याअंतर्गत बुधवार दि.१६ जुलै रोजी भाजपा युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष निळकंठ चाटे, सुरेश टाक, शंकर गवते, रमेशअप्पा काळे, महेशअप्पा शिंदे, नवनाथ सिरसागर, बाबासाहेब शिंदे, राजेंद्र ओझ, महादेव ईटके, अरुण पाठक, आश्विन मोगरकर, बंडू नाना कोरे, विजय दहिवाळ, योगेश पांडकर, वैजनाथ रेकने, दिलीप नेहरकर, सुशील हरंगुळे, श्रीपाद शिंदे, गणेश भंडारे, मंगेश काटे, अभिजीत शेंद्रे,चंदा ठोंबरे, सारिका कुरिल, नंदा पुरभूज, वर्षा जोशी, ॲड.शुभांगी गिते, शैला बाहेती, आशा धुमाळ, सविता डुबे, ज्योती नागापूरकर, दुर्गा राठौर, अनिता धुमाळ, रोशनी नाथांनी, कल्पना कुचेरीया, विजया दहिवाळ, सुरेखा बेंडसुरे, माधुरी जोशी, ऊर्मिला जोशी, रेखा जोशी, ॲड.प्रतिक्षा तरकसे यांच्या उपस्थितीत वृक्ष लागवड करण्यात आली.यावेळी बोलताना भाजपा शहराध्यक्षा सौ.उमाताई समशेट्टे यांनी सध्या आम्ही परळी शहरात करत असलेल्या वृक्षलागवडीस परळीकरांचा मोठा प्रतिसाद मिळत आहे.आम्ही लावलेल्या रोपट्यांची योग्य पध्दतीने जोपासणा झाली तर हीच रोपटी मोठी झाली तर ना.पंकजाताईंच्या स्वप्नातील ग्रीन परळीचे स्वप्न साकार होईल असा विश्वास व्यक्त केला.

## मूर्ती प्रतिष्ठापना आणि कलशारोहण कार्यक्रमास उपस्थित रहावे!

बीड । प्रतिनिधी

येथील मोंढा रोड, सावता माळी चौका जवळील श्री विठ्ठल रुक्माई आणि श्री संत शिरोमणी सावता महाराज यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा ता.१८ जुलै शुक्रवार रोजी आयोजित करण्यात आली आहे. सदर धार्मिक कार्यक्रमास बीड शहर आणि आसपासच्या पंचक्रोशीतील सर्व भाविक भक्तांनी उपस्थित रहावे, असे आवाहन मंदिर बांधकाम कमिटीने केले आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की बीड आणि बीड परिसरातील माळी समाज बांधवांनी लोकवर्गणीतून भव्य दिव्य स्वरूपात श्री संत सावता महाराज मंदिर स्थापन केले आहे. मंदिरा शेजारीच शासनाच्या माध्यमातुन समाजासाठी मोठे सभागृह उपलब्ध झाले आहे. हे माळी समाज आणि इतर समाजासाठी अध्यात्मिक,धार्मिक अशा स्वरूपाचे ठिकाण बनले आहे. सामाजिक सलोखा,सहिष्णुता, बंधुभाव या ठिकाणाहुन जोपासला जाणार आहे.

येथे उद्या होणाऱ्या मूर्ती प्रतिष्ठापना आणि कलशारोहण कार्यक्रमास सर्व समाजातील लोकांनी उपस्थित राहावे,असे आवाहन श्री संत सावता महाराज मंदिर बांधकाम कमिटीने केले आहे. शुक्रवारी सकाळी ७.३० ते९ या वेळेत मूर्तिची मिरवणूक मंदिर स्थळापासुन निघणार आहे. सकाळी ८ ते ११ या वेळेत मूर्ती प्राणप्रतिष्ठेचा आणि कलशारोहणचा धार्मिक कार्यक्रम होणार आहे. कीर्तन केसरी आणि कुट अभंग विश्लेषक ह.भ.प. महादेव महाराज राऊत (जवळेकर),श्री संत सावता महाराजांचे १७वे वंशज ह.भ.प. श्री रविकांत महाराज वसेकर तसेच महंत स्वामी लक्ष्मण महाराज( चैतन्य संस्थान के. परभणी)यांची उपस्थिती लाभणार आहे. सकाळी ११ ते १ या वेळेत ह. भ. प.श्री महादेव महाराज राऊत जवळेकर यांचे सुश्राव्य कीर्तन होणार आहे. दुपारी एक वाजता भाविक भक्तांसाठी महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. ही पंगत येथील दानशुर नागरिक श्री अनंतराव चौधरे देणार आहेत. वरील सर्व कार्यक्रमाचा लाभ आणि भक्तांनी घ्यावा असे आवाहन मंदिर कमिटीच्या वतीने करण्यात आलेआहे.

## अनिल जगताप यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांचा शिवसेनेत जाहीर प्रवेश

बीड। प्रतिनिधी

हिंदुहृदयसम्राट मा. बाळासाहेब ठाकरे, धर्मवीर आनंद दिघे साहेब यांच्या विचारांना प्रेरित होऊन आणि महाराष्ट्र राज्याचे कर्तव्यदक्ष उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते मा. एकनाथ शिंदे साहेब व संसदरत्न खा. डॉ श्रीकांत शिंदे साहेब यांच्या नेतृवाखाली सुरु असलेल्या शिवसेनेच्या दमदार कार्यपद्धतीस प्रभावित होऊन शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, तालुकाप्रमुख वडवणी माऊली गोंडे, तालुकाप्रमुख धारूर नारायण कुरुंद यांच्या माध्यमातून बीड जिल्ह्यातील वडवणी तालुक्यातून रामदास भाई ढगे, संदिप माने, शिवाजी सावंत, महादेव मस्के, रमेश कुरकुटे, दत्ता सावंत, रमेश चौधरी, ज्ञानेश्वर मोरे, शिवाजी गोंडे, माऊली आगलावे. धारूर तालुक्यातून अनंत चिंचाळकर, शेख गफार



शेख सत्तार, वशिष्ठ सातपुते , अनिल गांजले, सुनील कोमटवार, अमोल शिरसाट, दीपक चिद्रवार, विशाल भैरे यांच्या समावेत असंख्य कार्यकर्ते, पदाधिकारी व लोकप्रतिनिधींनी काल दि. १५ जुलै २०२५ रोजी रात्री११ वाजता दरम्यान मुक्तागिरी निवासस्थान, मुंबई येथे उपमुख्यमंत्री शिंदे साहेब यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये शिवसेनेत जाहीर प्रवेश केला. याप्रसंगी शिंदे साहेबांनी सर्वांचे स्वागत केले. तसेच स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुका तोंडावर येऊन ठेपलेल्या आहेत, या निवडणुका कार्यकर्त्यांच्या आहेत. यामुळे जबाबदारी सर्व पदाधिकारी शिवसैनिकांनी स्थानिक स्वराज्य संस्थावर शिवसेनेचा भगवा फडकवण्याचा निर्धार करा आणि कामाला लागा. उपमुख्यमंत्री तथा शिवसेना मुख्य नेते एकनाथजी शिंदे साहेब यांनी प्रवेश सोहळ्या दरम्यान सर्वांना संबोधित केले.

## जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा आयोजनाच्या तारखेत बदल

बीड । प्रतिनिधी

या वर्षात जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय बीड मार्फत जिल्हा क्रीडा संकुल, बीड येथे दि. १७ ते १८ जुलै २०२५ रोजी करण्याचे निश्चीत करण्यात आले होते परंतु काही तांत्रिक कारणास्तव सदर तारखेत बद्दल करण्यात आला असुन स्पर्धा आयोजनाची सुधारित दिनांक २४ ते २५ जुलै २०२५ या कालावधीत जिल्हास्तर शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेने २०२५-२६ मधील शालेय क्रीडा स्पर्धांचा शुभारंभ होणार आहे.

सदर स्पर्धा हया १५ वर्षा खालील मुले व १७ वर्षाखालील मुले व मुली या वयोगटात होत आहेत. दि. २४ जुलै २०२५ रोजी १७ वर्षाखालील मुले व मुली तर दि. २५ जुलै २०२५ रोजी १५ वर्षाखालील मुले या वयोगटातील स्पर्धा होतील. स्पर्धेचे प्रवेश आणि प्रवेश शुल्क ऑनलाईन पद्धतीने दि. २३ जुलै २०२५ रोजी रात्री १०.०० वाजेपर्यंत स्विकारले जाणार आहेत. स्पर्धेतील सामने जिल्हा क्रीडा संकुल, बीड च्या मैदानावर घेण्यात येणार आहेत. जिल्हास्तर स्पर्धेनंतर विभागस्तर आणि राज्यस्तर सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

विभागस्तर शालेय सुब्रतो कप फुटबॉल स्पर्धा हया बीड येथे दि. २८ ते २९ जुलै २०२५ रोजी जिल्हा क्रीडा संकुल मैदान, बीड येथे होणार आहेत. विभागस्तर स्पर्धेतील वयोगट निहाय विजयी संघांना राज्यस्तर स्पर्धेत प्रवेश मिळणार आहे. जिल्हास्तरीय स्पर्धेत सहभागापुर्वीच .. या संकेतस्थळावर खेळाडू व संघाची नोंदणी करणे अनिवार्य आहे. तसेच प्रत्येक सहभागी संघानी रू. २०००/- प्रवेश फी भरलेल्या नोंदणीकृत संघांनाच या स्पर्धेत सहभागी करून घेण्यात येईल. राज्यस्तर स्पर्धेतील विजेत्या संघाला सुब्रतो मुखर्जी स्पोर्टस एज्युकेशन सोसायटीतर्फे आयोजित राष्ट्रीय स्पर्धेत सहभागी होण्याची संधी मिळणार आहे.

शालेय सुब्रतो मुखर्जी चषक फुटबॉल स्पर्धेच्या अधिक माहितीसाठी क्रीडा अधिकारी श्री. कालिदास होसूरकर ९४२१५९५५१५, स्पर्धा संयोजक श्री. जितेंद्र आराक ९२२६४८१७२८ या भ्रमणध्वनी क्रमांकावर कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा क्रीडा अधिकारी श्री. अरविंद विद्यागर यांनी केले आहे.

## परतूर तालुक्यातील ११ ग्रामपंचायती अनुसूचित जातीसाठी आरक्षित

परतुर। प्रतिनिधी

परतुर तालुक्यातील ८१ सरपंच पदाचे आरक्षण आज सोमवारी (ता. १४) तहसिल कार्यालयात सोडत पध्दतीने काढण्यात आले. ८१ पैकी ११ ग्रामपंचायती अनुसूचित जातीसाठी सुटल्या असून, ओबीसीला २२, अनुसूचित जमातीला १ तर सर्वसाधारण गटाला ४७ ग्रामपंचायती सुटल्या आहेत. तहसिलदार प्रतिभा गोरे यांच्या उपस्थितीत लहान मुलाच्या हस्ते चिठ्ठी पध्दतीने हे सरपंच पदाचे आरक्षण निश्चित करण्यात आले. अनुसूचित जातीसाठी वाहेगाव सातारा, रोहिना खु, एकरूखा, वाहेगाव श्रीष्टी, सावंगी गंगाकिनारा, वाघाडी-वाघाडी वाडी- ब्राह्मनतांडा या ग्रामपंचायती तर अनुसूचित जाती महिलांसाठी सिंगोना, नांद्रा, श्रीष्टी, आंबा, ब्राह्मणवाडी या ग्रामपंचायती सुटल्या आहेत.

अनुसूचित जमातीसाठी देवला ही एकमेव ग्रामपंचायत आरक्षीत झाली आहे. ओबीसी अर्थात नागरीकांच्या मागास प्रवर्गासाठी एकुण ८१ पैकी ओबीसीसाठी २२, अनुसूचित जमातीला १ तर सर्वसाधारण गटाला ४७ग्रामपंचायत कोरेगांव-नागापुर, लिंगसा, वरफळ, पांडे पोखरी, पाटोदा गाव, हातडी, कहऱ्हाळा, खांडवी वाडी, बाबई आणि अकोली तर ओबीसी प्रवगातील महिलांसाठी संतोना खु, पिंप्रुळा, टाकळी रंगोपंत, राणी वाहेगाव-व्होडेगाव, मसली, रायपुर, संकनपुरी, वाढोना, श्रीधरजवळा-पिंपरखेडा गरड, अंगलगाव आणि फुलवाडी-पळशी ग्रामपंचायतीचे सरपंच पद आरक्षीत झाले आहे. सर्वसाधारण गटासाठी रायगव्हाण, हनवडी-गणेशपुर-तोरणा, शेवगा, डोल्हारा, सातारा-वाहेगाव, चांगतपुरी, येणोरा, वाटूर, बामणी, अनंदगाव, एदलापुरी, मापेगाव बु., गोळेगाव-लांडकदरा, आष्टी, सिरसगाव, दहिफळ भोंगाणे, सुरुमगांव, कोकाटे हादगांव, सातोना ब्रद्रुक, आनंदवाडी, हास्तुरतांडा, ढोकमाळतांडा, श्रीष्टी या ग्रामपंचायतीचे सरपंचपद आरक्षित झाले असून, सर्वसाधारण महिलांसाठी माव पाटोदा, वलखेड, पिंपळी धामणगांव, शेलगांव, रोहिणा बुदूक, लोणी खुर्द-कनकवाडी, खांडवी, बाबुलतारा, सावरगांव ब्रदुक, दैठणा ब्रदक, उस्मानपुर, लिखीत पिंप्री, सालगांव-रेवलगांव, दैठणा खुर्द, पाडळी-पारधी, वैजोडा, कावजवळा, परतवाडी, बानाची वाडी-वडारवाडी, मापेगांव खुर्द, वरफळवाडी, चिंचोली-फिरोजाबाद, खडकी-कंडारी, सोयंजना-शेलवाडा या ग्रामपंचायतींचे सरपंचपद आरक्षित झाले आहे.

**जाहिर प्रगटन**

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२-४८३-२७५०२६**

**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-८४**

**दिनांक -०२/०७/२०२५**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती प्रमिला रामेश्वर चव्हाण रा. भिमानाईक तांडा ता.अंबड जि. जालना यांनी यांच्या मुलगीच्या जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मि ळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | साक्षी रामेश्वर चव्हाण | मुलगी | ०१/०१/२००६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी. आज दिनांक-०२/०७/२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

## अंबडमध्ये १११ पैकी तब्बल ५६ ग्रामपंचायतीवर येणार महिलांचे राज्य

अंबड। प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील १११ ग्रामपंचायतींच्या सरपंचपदाचे आरक्षण निश्चिती सोमवारी अंबड तहसील कार्यालयाच्या सभागृहात उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी, तहसीलदार विजय चव्हाण यांच्या उपस्थितीत जाहीर करण्यात आले. अंबड तालुक्यातील १११ ग्रामपंचायतीचे सरपंचपदाचे आरक्षण कु. अदिती अनिल मुंढे वा लहान मुलींच्या हस्ते चिठ्ठी काढून काढण्यात आले. आरक्षण सोडतीमुळे अनेक गावांमधील राजकीय समीकरणांमध्ये बदल झाला असून, गावचा सरपंच कोण होणार चित्र लवकरच स्पष्ट होणार.

आरक्षण सोडत प्रसंगी नायब तहसीलदार महेंद्र गिरगे, एकनाथ भोजने, विश्वास धर्माधिकारी, निवडणूक विभागाचे भागवत देशमुख यांच्या समक्ष १११ गावांची आरक्षण सोडत जाहीर करण्यात आली. सर्वसाधारण प्रवर्गातील गावे चंदनापुरी बु/रेणापुरी, गौरी/ गंधारी, रामगव्हाण बु, खडकेश्वर/भाटखेडा, दुधपुरी, पाथरवाला बु/कुरण, लासुरा वडीलासुरा, वहयाळा, माहेरभायगाव, पुगउँटायगाव, नांदी, वाळकेश्वर, कौचलवाडी, चुर्गापुरी, भालगाव, कुक्कलगाय, नालेवाडी, सिरनेर, वाडेगाव/मठवांडा, बनलकळी, शहापूर, चंदनापुरी खुर्द, देशरव्हाण, चिकनगाव, बड्?याचीवाडी लेभेवाडी, मठपिंपळगाव, सोनकपिंपळगाव, पांगरखेडा, मठजळगाव, शहागड, बठाण खुर्द, बारसवाडा या गावांचा समावेश आहे. गाव निहाय आरक्षण सोडतीमध्ये अनुसूचित जाती (महिला) भिवडी बोडखा । वलखेडा, किनगाववाडी, पारनेर । साडेगाव, लोणारभायगाव । जामखेड अनुसूचित जातं (सर्वसाधारण) साठी सारंगपूर । नारायणगाव (कासारवाडी) यहीपुरी, चाकलगाव, डालसखेडा भांवेरी, धनगर पिंप्री, अनुसूचित जमाती (महिला) माडी, वडीगोई अनुसूचित जमाती (सर्वसाधारण ५ डोमलगाव नागरिकांच । मागासप्रवर्ग (महिला) डोमेगाव । आपेगाव, झोडेगाव/कानडगाव । करंजव्ळा/जालुरा/ रेवलगाव, । साडेसावंगी, दीदडगाव/ सींदलगाव, । झिर्षी, नागझरी, शेवगा, पिंपरखेड । ताडहादगाव, हसनापूर, शिराढोणा, । वाडी शिराढोण, काटखेडा । निहालसिंगवाडी या गावांचा समावेश आहे. नागरिकांचा मागासप्रवर रुई, कर्जत, पानेगाव, पाथरवाला खुर्द, गंगाचिंचोली/ इंदलगाव, पराडा, अंतरवाली सराटी, धनगर पिंपळगाव, चांभारवाडी, हारतखेडा आदी गावांचा समावेश आहे. तर सर्वसाधारण महिला प्रवर्गामध्ये हस्तपोखरी, एकलहेरा, लालवाडी, बोरी, गोंदी, बडीकाळ्या, बधापूर/अंतरवाला/आवा, महाकाळा/ भगवाननगर /गहिनीनाथनगर, भाडर्डी, पिठोरी सिरसगाव, कवडगाव, कोठाळा खुर्द, बळेगाव, ईश्वरनगर/वसंतनगर/ कैलासनगर, रामनगर, कोळी सिरसगाव, वाघलखेडा, रोहिलागड, बनगाव / दहिगव्हाण/बेलगाव, साष्टपिंपळगाव, डावरगाव, मस्या, जोगेश्वरवाडी / विठठलवाडी, गोविंदपूर, राहुवाडी/ गंगारामवाडी, पावसे पांगरी, चिंचखेड, लखमापूरी, सुखपुरी, खेडगाव, माळ्याचीवाडी/ भोकरवाडी या गावांचा समावेश आहे.

## कारंजा टॉवरच्या सुशोभीकरणासाठी वृक्षदान




बीड। प्रतिनिधी

शहरातील मिल्लिया प्राथमिक शाळेच्या (मुलींची) मुख्याध्यापिका मिर्झा कनिज़ फातेमा यांनी त्यांच्या वाढदिवसानिमित्ताने ऐतिहासिक कारंजा टॉवरच्या सुशोभीकरणासाठी वृक्षदान केले. यामुळे या ऐतिहासिक वास्तूसाठी आता महिला मुख्याध्यापिका सुद्धा सरसावल्याचे दिसून आले असले तरी बीड नगर परिषद आणि जिल्हा प्रशासन अजूनही कार्य शून्य असल्याचेच दिसत आहे.

मुख्याध्यापिका कनिज़ फातेमा यांच्या इच्छेनुसार त्यांचा वाढदिवस ऐतिहासिक कारंजा टॉवर समोर वृक्षारोपण करून साजरा करण्यात आला. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे बीड जिल्हा उपाध्यक्ष झुंजार धांडे, हाजी तालेब पटेल, मधुकर धांडे, शेख वसीम, ख़िज़र खान, रिज़वान खान, शहिंशाह खान यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले तर प्रमुख पाहुणे म्हणून ऐतिहासिक कारंजा टॉवर चे परिपूर्ण नूतनीकरण व्हावे याकरिता गेल्या ११ वर्षांपासून सातत्याने शासन-प्रशासन दरबारी लढा देणारे मुक्तपत्रकार एस.एम.युसूफ़ आणि ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा उद्योजक रमेशराव गंगाधरे उपस्थित होते.

# घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनामध्ये प्रलंबित ४०० गावांचे नियोजन काटेकोरपणे करा- सीईओ जतिन रहमान



बीड । प्रतिनिधी

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनामध्ये प्रलंबित असलेल्या ४०० गावांचे नियोजन अत्यंत काटेकोरपणे होणे आवश्यक आहे त्याकरिता संबंधित सर्व सरपंच ,ग्रामपंचायत अधिकारी , पंचायत समिती स्तरावरील अधिकारी कर्मचारी,तांत्रिक शाखा यांनी पाठपुरावा करून कामे पूर्ण करून घ्यावेत तसेच सप्टेंबर अखेरपर्यंत गावे ओ डी एफ मॉडेल करण्यासाठी गावनिहाय व करावयाच्या कामनिहाय नियोजन करावे अशा सूचना मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहमान यांनी दिल्या आहेत. आज ४०६ गावांच्या ग्रामपंचायत अधिकारी व सरपंच यांच्या सुनावणी उपक्रमात ते बोलत होते . यावेळी विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी प्रदीप काकडे , ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता सुनील धाबेकर, सर्व उपविभागांचे उप अभियंता यांची उपस्थिती होती.

घनकचरा व सांडपाणी व्यवस्थापनामध्ये यावर्षीच्या आराखड्यामध्ये जिल्ह्यातील १३५६ गावांचा समावेश आहे त्यापैकी ४०६ ग्रामपंचायती प्रलंबित असल्याने कामावर परिणाम झाला होता.

प्रत्यक्षात कामे सुरू न केलेली १९३ गावे यांचा आढावा घेऊन ग्रामपंचायत अधिकारी यांना तात्काळ सुरू करण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी आदेशित केले आहे. ज्या गावात काही अडचणी असतील तात्काळ त्यावरती उपाययोजना करून कामे मार्गी लावण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सूचना केल्या आहेत. अत्यंत किरकोळ कामे देखील रेंगाळली आहेत असे निदर्शनास आलेल्या ३९ ग्रामपंचायतीच्या ग्रामपंचायत अधिकाऱ्यांना पुढील आठ दिवसांमध्ये कामे पूर्ण करून तसेच जिओ टॅग केल्यानंतर गावे ग्रामसभेतून ओ डी एफ प्लस मॉडेल करण्याबाबत आदेशित केले आहे. पंचायत समिती स्तरावर व जिल्हा स्तरावर प्रलंबित असलेल्या ६४ ग्रामपंचायतींचे तांत्रिक व प्रशासकीय मान्यतेबाबत पुढील दोन दिवसात निर्णय घ्यावा तसेच पुढील काळात एकही प्रशासकीय अथवा तांत्रिक शिल्लक राहणार नाही याची काळजी घेण्याचे आदेश संबंधितांना मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी दिले आहेत. अत्यंत संथ गतीने होत असलेल्या ६७ गावांच्या सरपंच व ग्रामपंचायत अधिकारी तसेच आज झालेल्या सुनावणी नंतर जर कामे झाली नाही अशा ग्रामपंचायत अधिकारी, अंमलबजावणी सहाय्य संस्था

◀◀ पान ३ वर

### कचरा वर्गीकरण केंद्र सक्तीचे

केवळ ग्रामपंचायत असेल किंवा वाडी वस्ती असलेली ग्रामपंचायत असेल अशा परिस्थितीत प्रत्यक्षात एका ठिकाणी कचरा वर्गीकरण करण्यासाठी कचरा वर्गीकरण केंद्र हे सक्तीचे आहे. त्यामुळे त्या ग्रुप ग्रामपंचायत मधील किमान एका गावात तातडीने सर्व प्रकारची कामे पूर्ण करून घ्यावी तसेच प्रलंबित असलेल्या कचरा वर्गीकरण केंद्रांना पंधराव्या वित्त आयोगातून तांत्रिक मान्यता घेऊन कामे पूर्ण करून घ्यावी तरच ग्रामपंचायत पूर्णतः कचरा वर्गीकरण करण्यासाठी तयार असल्याचे दिसून येईल.प्रत्येक ग्रामपंचायत मध्ये कचरा वर्गीकरण केंद्राची आवश्यकता आहे. त्याशिवाय गाव पूर्ण होऊ शकत नाही त्यामुळे अश्या केंद्रासाठी पंधरावा वित्त आयोग आराखड्यात बदल करायचा असेल तर तात्काळ माझ्याकडून बदल करून घ्यावा असे आवाहन देखील मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केले आहे.

## नारायण गड, गड नसून श्रद्धा अस्मिता स्वाभिमान आहे सुरू असलेले वादंग अशोभनीय - नाईकवाडे , धांडे





बीड । प्रतिनिधी

जिल्ह्याची धाकटी पंढरी म्हणून प्रचलित असलेले नारायण गड जिल्ह्यासह उभ्या महाराष्ट्रात प्रसिद्ध आहे या गडाची लोकप्रियता अफाट असून लाखो लोकांची श्रद्धा गडावर आहे गडाला एका समाजाचेच लोक मानणारे आहे असे मुळीच नाही तर सर्व अठरा पगड जातींच्या लोकांचे गडावर प्रेम आहे गडासोबत अनेकांच्या भावना ,अस्मिता आणि श्रद्धा जोडल्या गेल्या आहेत म्हणून उभ्या महाराष्ट्रातून लाखो भाविक गडाच्या दर्शनासाठी येत असतात असे असताना

या सर्व लोकांच्या श्रद्धा ,अस्मिता आणि प्रेमाचा कुठे तरी खेळ मांडल्या सारखी परिस्तिथी झाली आहे काहींनी हे सर्व का सुरू केले आणि कशासाठी हे सर्व सामान्य लोकांसाठी न सुटणार कोड. आहे.

हे कशासाठी होत आहे कोणाला या प्रकरणाच्या आडून काय साधायचे आहे हे सर्व भाविकांना कळायला मार्ग नाही मात्र त्यांनी आपल्या स्वतःच्या स्वार्थासाठी गडाच्या नावावरून असे प्रकार करणे अशोभनीय आहे गड अनेकांच्या अस्मितेचा प्रश्न आहे आणि हीच अस्मिता वर्तमान पत्रे ,इलेक्ट्रॉनिक मीडिया ,सोशल मीडिया च्या माध्यमातून चव्हाट्यावर आणण्याचे प्रकार सुरू आहे हे सर्व प्रकार पाहून आमच्या सारख्या अनेक गडावर भक्ती असणाऱ्या भाविकांना वेदना होत आहेत अन्? अश्याच वेदना आमच्या सारख्या लाखो लोकांच्या आहेत .

गड हा राजकारणाचा विषय नसून भक्तीचा शक्तीचा संगम आहे यात

◀◀ पान ३ वर

## गटाराचे पाणी रस्त्यावर साचल्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका : प्रशासनाचे दुर्लक्ष



अंबाजोगाई । प्रतिनिधी

शहराच्या दक्षिणेला तथागत चौकातून पोखरी कडे जाणाऱ्या रस्त्यावर दररोज पंधराहजार नागरिक येणेजाणे करतात या रस्त्यावर गटाराचे पाणी साचल्यामुळे त्यातून वाहन चालवावे लागते गटाराच्या पाण्यामुळे नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला आहे . या प्रकरणी प्रशासन व लोकप्रतिनिधी यांनी दुर्लक्ष केल्याचे दिसते. येथील तथागत चौकातून पोखरी गावाकडे जाणाऱ्या मार्गावर काही दिवसांपूर्वी सिमेंटचा रस्ता झाला परंतु रस्त्याच्या बाजूला नाल्या झाल्या नाहीत .

या परिसरात नवनवीन इमारती उभारल्या . वस्ती आणि लोकसंख्या वाढली . या परिसरात सहा शाळा व बालवाड्या आहेत . हजारो विद्यार्थ्यांची वर्दळ असते. सिलवर सिटी कडून नात्याचे पाणो रस्त्यावर सोडण्यात आल्याचे तेथील नागरिकांनी सांगितले. या भागात गटाराचे पाणी साचले असल्यामुळे दुर्गंधी सुटली आहे . गटाराच्या पाण्यातून वहातुक सुरु असून नागरिकाचे आरोग्य धोक्यात आले आहे . पोखरी मार्गाच्या बाजूला सिमेंट कॉक्रीटच्या नाल्या बांधाव्यात , अशी मागणी नागरिकांतून होत आहे . प्रशासन,जोगाईवाडी ग्रामपंचाय , आमदार , खासदार व पालक मंत्र्याकडे निवेदने दिली परंतु या प्रश्नाकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसते.पोखरी मार्गावरील नागरिकांनी एक बैठक झाली त्यात हजारों शालेय विद्यार्थी व नागरिक मिळून प्रशासन आणि लोकप्रतिनिधि कडे पोखरी रस्त्याच्या बाजूला सिमेंट नाल्या बांधण्याची मागणी करण्याचे ठरले .

## प्रवीण गायकवाड यांच्यावर झालेल्या हल्ल्याचा निदर्शने करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन



बीड । प्रतिनिधी

आज दिनांक १६ बुधवार रोजी दुपारी बारा वाजता जिल्हाधिकार्यालय बीड या ठिकाणी निदर्शने करून जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन देण्यात आले. अक्कलकोट येथे झालेल्या कार्यक्रमासाठी प्रवीण दादा गायकवाड गेले असता त्या ठिकाणी सत्ताधारी पक्षातील गुंड प्रवृत्तीचे लोक त्यामध्ये प्रमुख असलेला दीपक काटे याच्यावर खून दरोडे खंडणी असे अनेक गुन्हे दाखल आहेत त्याच्यावर मोक्का लावून कडक कारवाई करावी या मागणीसाठी जिल्हाधिकाऱ्यांना बीड शहरातील सर्व समविचारी संघटनाच्या वतीने निवेदन देण्यात आले आहे जर यावर कारवाई झाली नाही तर संपूर्ण जिल्ह्यात मोठ्या प्रमाणात आंदोलन करण्यात येईल असा इशारा सर्व पदाधिकारी कार्यकर्ते यांनी दिला आहे यावेळी संभाजी ब्रिगेडचे प्रदेश उपाध्यक्ष शरद भाऊ चव्हाण एमआयएमचे जिल्हाध्यक्ष शेख शफिक भाऊ महादेव अण्णा धांडे अशोकराव हिंगे गोविंद कदम शिवसेनेचे तालुकाप्रमुख संतोष जाधव संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष गणेश मस्के वंचित बहुजन आघाडीचे जिल्हाध्यक्ष अजय सरवदे सिद्धार्थ शिनगारे मराठा महासंघाचे जिल्हाध्यक्ष गणेश नाईकवाडे शिवसंग्राम

◀◀ पान ३ वर

## हिंदू मुस्लिम एकतेचे प्रतीक सुलेमान बाबा यांचा गुरुवारी ऊर्स



म्हसोबावाडी ( प्रतिनिधी)

आष्टी तालुक्यातील सुलेमान देवळा येथील ग्रामदैवत हजरत सुलेमान बाबा यांचा उरूस आज गुरुवार रोजी साजरा होत आहे.

सुलेमान बाबा यांचा ऊर्स म्हणजे यात्रा आषाढ महिन्याच्या तिसऱ्या गुरुवारी असते परंतु लक्ष्मी आईची यात्रा तिसऱ्या मंगळवारी झाल्या शिवाय बाबांची यात्रा होत नाही.म्हणून यंदा चौथ्या गुरुवारी ही यात्रा साजरी होत आहे.ही यात्रा गावातील तसेच बाहेरील सर्व जाती धर्मातील लोकं मोठ्या उत्साहात साजरी करतात.यावेळी बाहेरूनही भाविक मोठ्या संख्येने उपस्थित राहतात.सकाळी गावातून मिरवणूक काढली जाते.त्यानंतर डोंगरावर असलेल्या दर्ग्यावर चादर अर्पण केली जाते.

◀◀ पान ३ वर

## शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी विकसित महाराष्ट्र सर्वेक्षणात सहभागी व्हावे -जिल्हाधिकारी

बीड । प्रतिनिधी

विकसित महाराष्ट्र २०४७ चे नागरिक सर्वेक्षण १७ जुलै, २०२५ पर्यंत पूर्ण करावयाचे आहे. या सर्वेक्षणात सामान्य नागरिकांचा सहभाग महत्वाचा आहे, जेणेकरून त्यांच्या समस्या, शासनाकडून असलेल्या अपेक्षा याबाबत माहिती घेऊन त्यानुसार रोडमॅप तयार करणे शक्य होणार आहे. त्या अनुषंगाने सर्व प्रथम सर्व शासकीय अधिकारी, कर्मचारी यांनी स्वतः

या लिंकवर क्लिक करुन सर्वेक्षणात सहभागी व्हावे. आपल्या कुटुंबातील सर्व सदस्यांना देखील सर्वेक्षणात सहभागी करुन घ्यावे, असे आवाहन जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी केले आहे.

तद्नंतर आपल्या अधिनस्त किंवा संपर्कात येणाऱ्या सर्व नागरि कांना सर्वेक्षणात सहभाग नोंदविण्यासाठी प्रोत्साहित करावे. आपल्या गावातील, शहरातील तसेच नातेवाईक, मित्रांच्या व्हाट्सएप ग्रुपवरुन याबाबत जागृती करावी, जेणेकरुन बीड जिल्ह्यातून जास्तीत जास्त नागरिकांचा सहभाग नोंदविणे शक्य होणार असल्याचेही जिल्हाधिकारी जॉन्सन यांनी शासकीय यंत्रणाना सांगितले आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी ०६ मे २०२५ ते ०२ ऑक्टोबर २०२५ या कालावधीत १५० दिवसांचा कार्यक्रम राबविण्याची घोषणा केली आहे. त्यामध्ये विकसित महाराष्ट्र २०४७ करिता व्हिजन डॉक्यूमेंट तयार करण्याचा समावेश करण्यात आलेला आहे.

## चकलांबा पोलीस ठाण्याची रेती चोरीविरोधातील धडक कारवाई ; ५ लाख ६० हजारांचा मुद्देमाल जप्त



बीड । प्रतिनिधी

चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत राक्षसभुवन परिसरातील गोदावरी नदी पात्रामध्ये अवैध वाळू उपसा करताना चकलांबा पोलिसांनी एका ट्रॅक्टरसह चालकास ताब्यात घेतले ही कारवाई १६ जुलै रोजी करण्यात आली. चकलांबा पोलीस स्टेशन हद्दीतील राक्षसभुवन परिसरातील गोदावरी नदी पात्रात ट्रॅक्टरद्वारे बेकायदेशीरपणे रेतीची वाहतूक केली जात असल्याची गोपनीय माहिती पोलीसांना प्राप्त झाली.

सदर माहितीच्या आधारे पोलीस स्टेशन चकलांबा येथील सपोनि संदीप पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली तात्काळ स्टाफ रवाना करण्यात आला. पोलीस पथकाने नदीपात्रात जाऊन घटनास्थळी छापा टाकला असता, एक ट्रॅक्टर रेतासह आढळून आला. ट्रॅक्टर चालकास घटनास्थळीच ताब्यात घेण्यात आले.

या कारवाईत अंदाजे रुपये ५,६०,०००/- किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून, यामध्ये ट्रॅक्टरसह रेतीचा समावेश आहे. याप्रकरणी आरोपी जमीर आरिफ शेख, वय २१ वर्ष, रा. राक्षसभुवन याच्याविरुद्ध संबंधित कायद्याखाली गुन्हा दाखल करण्यात आला असून, पुढील कायदेशीर कार्यवाही सुरू आहे.सदर कारवाई पोलीस अधीक्षक नवनीत कॉंवत, अपर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधिकारी निरज राजगुरू यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि संदीप पाटील, पोलीस अंमलदार १३२ वंजारे, २००४ कैलास खटाने, २३१ प्रशांत घोंगडे, २०६० हनुमान इंगोले यांनी केली आहे.

## मोफत त्वचारोग शिबिरात १२७ गरजू रूग्णांचे उपचार



अंबाजोगाई । प्रतिनिधी

जागतिक त्वचारोग दिनानिमित्त शहरात प्रथमच आयोजित निःशुल्क त्वचारोग निदान, उपचार व औषधी वाटप शिबिराचे आयोजन भारतीय त्वचारोग संघटनेकडून (आयए-डीव्हीएल) करण्यात आले होते. या शिबिरात १२७ गरजू रूग्णांची मोफत तपासणी, निदान व उपचार करण्यात आले.

या अनोख्या उपक्रमाबद्दल अधिक माहिती देताना जिविका स्किन हेअर व लेझर सेंटर, मुळे हॉस्पिटलच्या संचालिका डॉ.जिगिषा मरवाळे - मुळे (एम.डी.स्किन) यांनी सांगितले की, जागतिक त्वचारोग दिनानिमित्त रविवार, दिनांक १३ जुलै रोजी एकाच वेळी देशातील विविध भागात एकूण ८०० निःशुल्क त्वचारोग व औषधी वाटप शिबिरांचे आयोजन भारतीय त्वचारोग संघटनेकडून (आयए-डीव्हीएल) करण्यात आले होते. गिनीज बुक ऑफ रेकॉर्डमध्ये याची नोंद व्हावी यासाठी या उपक्रमाचा तपशील त्यांना पाठविण्यात आला आहे. याच उपक्रमाचा एक भाग म्हणून अंबाजोगाई येथील जिविका स्किन हेअर व लेझर सेंटर, मुळे हॉस्पिटल येथे शहरात प्रथमच इंडियन असोसिएशन ऑफ डमटोलॉजिस्टस व्हेनरियोलॉजिस्टस ऍण्ड लेप्रोलॉजिस्टस (आयए-डीव्हीएल) या त्वचा रोग तज्ज्ञांच्या राष्ट्रीय संघटनेमार्फत आयोजित मोफत त्वचारोग शिबिरात तज्ज्ञ व अनुभवी डॉक्टरांकडून १२७ गरजू रूग्णांचे निदान व उपचार करण्यात आले. डॉ.मुळे पुढे म्हणाल्या की, सदर उपक्रमाअंतर्गत देशभरातील एक लाखांहून अधिक नागरिकांची तपासणी करण्यात आली. आजपर्यंत एकाच दिवशी मोफत शिबीराच्या माध्यमातून केलेली ही विक्रमी रूग्ण व शिबीरांची संख्या आहे. सदर उपक्रमाच्या माध्यमातून नागरिकांमध्ये त्वचेच्या आजाराची जनजागृती करण्यात आली. दरम्यान त्वचारोग अभ्यासक्रमात त्वचा, नख, केस, सौंदर्य, लैंगिक आजार समस्या हे विषय इत्यंभूत आहे. परंतु, हल्ली कुणीही या विषयाचा संबंध नसतांनाही नागरिकांना विशिष्ट क्रिमचा सल्ला देतो. दरम्यान कुठलेही चुकीचे क्रिम लाऊन मुत्रपिंडावरही त्याचा परिणाम शक्य आहे. या औषधी डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय देता येत नाहीत. परंतु, सर्रास त्या औषधी नागरिकांपर्यंत पोहचतात. त्यामुळे नागरिकांमध्ये गंभीर परिणाम ही बघायला मिळत आहेत.

◀◀ पान ३ वर

## ध्येय साध्य करण्यासाठी स्वप्ने मोठी बघा: डॉ. सुमित नहार



माजलगाव । प्रतिनिधी

''ध्येय साध्य करण्यासाठी स्वप्ने मोठी बघा'' असे प्रेरणादायी मत डॉ. सुमित नाहर यांनी व्यक्त केले. ते माजलगाव येथील विद्याभुवन शिक्षण प्रसारक मंडळ संचलित सिंदफणा पब्लिक स्कूलच्या २३ व्या वर्धापन दिनाच्या कार्यक्रमात मुख्य अतिथी म्हणून बोलत होते. सकाळी शाळेच्या प्रांगणात झालेल्या या भव्य समारंभाला शिक्षकवर्ग, पालक व स्थानिक मान्यवर मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

दरवर्षीप्रमाणे या वर्षीही सिंदफणा पब्लिक स्कूलने आपल्या माजी विद्यार्थ्यास प्रमुख पाहुणे म्हणून निमंत्रित करून वर्धापन दिन साजरा केला. मुख्य अतिथी डॉ. सुमित नाहर यांनी शाळेच्या गेल्या २३ वर्षांच्या प्रवासाची दखल घेत शिक्षण क्षेत्रातील योगदानाचे कौतुक केले. त्यांनी विद्यार्थ्यांना उच्च ध्येय ठेवून त्यासाठी निरंतर प्रयत्न करण्याचा संदेश दिला आणि मोठी स्वप्ने पाहण्याचे महत्त्व सांगितले. या वेळी विद्यार्थ्यांनी सांस्कृतिक कार्यक्रमांचे भव्य आयोजन केले होते. भारतीय शास्त्रीय नृत्य, गायन, वाद्य वादन तसेच देशभक्तिपर कवितांच्या सादरीकरणाने उपस्थितांचे मन मोहून टाकले. विशेषतः विद्यार्थ्यांनी शिक्षणाच्या महत्त्वावर आधारित नाटिकेचे प्रभावी सादरीकरण केले, ज्याने सर्वांची मनापासून प्रशंसा मिळवली. या कार्यक्रमांमधून विद्यार्थ्यांच्या बहुमुखी प्रतिभेचे दर्शन झाले.

शाळेचे प्राचार्य अन्वर शेख यांनी या शैक्षणिक वर्षातील उपलब्धींची विस्तृत माहिती दिली. त्यांनी सांगितले की,या वर्षी शाळेतील विद्यार्थ्यांनी विविध स्पर्धांमध्ये उत्कृष्ट कामगिरी केली आहे.खेळ,शिक्षण आणि सांस्कृतिक क्षेत्रातील यशस्वी विद्यार्थ्यांना सन्मान करण्यात आले.या उपलब्धींमुळे शाळेचे नाव उंचावले आहे आणि विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळाली आहे.प्राचार्य शेख यांनी भविष्यातील योजनांची माहिती देत सांगितले की, शाळेत नव्या शैक्षणिक सुविधा व आधुनिक तंत्रज्ञानाचा

◀◀ पान ३ वर

## पोष्टल पत संस्था अध्यक्ष सचिव बडतर्फ निर्णयाला स्थगिती :व्यवहार ठप्प झाल्याने नाराजी

**बीड । प्रतिनिधी**

**बीड पोस्टल को-ऑपरेटिव्ह पतसंस्थेचे व्यवहार मागील अनेक वर्षापासून बीड डीसी बँकेमध्ये आहेत. बीड जिल्हा उपनिबंधक साहेबांनी पोस्टल पत पेढी चे अध्यक्ष आणि सचिव यांच्या बडतर्फीचा निर्णय दि. १७.०७.२०२५ रोजी दिला होता, त्या निर्णयाला विभागीय निबंध सहकारी संस्था लातूर यांनी स्थगिती दि. २६.०६.२०२५ दिलेली आहे .**

सचिव आणि अध्यक्ष यांनी बीड जिल्हा उपनिबंधक साहेब आणि डीसीसी बँकेस सादर केलेले आहे . परंतु जिल्हा उपनिबंधक साहेब बीड यांनी आर्थिक व्यवहार बंद करण्याबाबत कसलेही तोंडी अथवा लेखी आदेश बँकेत दिलेले नसता नाही ते डीसीसी बँकेने बीड पोस्टल पतसंस्थेचे आर्थिक व्यवहार कोणाच्या तरी सांगण्यावरून बंद केलेले आहेत. त्यामुळे पतसंस्थेच्या सभासदांचे आर्थिक नुकसान तसेच पतसंस्थे व बीड डीसीसी बँकेचे ही आर्थिक नुकसान झालेले आहे. बीड डीसीसी बँकेचे अधिकाऱ्यांना समक्ष भेटून व्यवहार चालू करण्याची विनंती केलेली होती, तसेच बीड जिल्हा उपनिबंधक साहेबांना ही लेखी निवेदन देऊनही पतसंस्थेचे आर्थिक व्यवहार बँकेने चालू केले नाहीत याची दखल बँकेच्या प्रशासकांनी घेऊन पतसंस्थेच्या सभासदांची आर्थिक मानसिक आणि शारीरिक पिळवणूक थांबवावी असे आवाहन पोस्टल पतसंस्थेचे अध्यक्ष आणि सचिव यांनी केलेले आहे संस्थेच्या सभासदांच्या पाल्यांच्या शिक्षणाच्या कामासाठी लग्नकार्याच्या कामासाठी शेती आणि आरोग्यविषयक कामासाठी पैशाची अत्यंत आवश्यकता असताना बँकेने हे व्यवहार बंद केले आहे ते त्वरित चालू करण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे असे आवाहन सामान्य सभासद आणि पदाधिकारी यांनी केले आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनने दिलेल्या प्रस्तावांवर त्वरित कार्यवाही करणार - पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल

**बारामती । प्रतिनिधी**

**बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनने मांडलेल्या प्रस्तावांवर त्वरित कार्यवाही करण्याचे आश्वासन पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीप सिंह गिल यांनी दिले. बारामती, इंदापूर, दौंड, पुरंदर आणि शिरूर परिसरातील उद्योजकांच्या बैठकीत बर्‍हाणपूर पोलीस उपमुख्यालयात त्यांनी हे वक्तव्य केले. अपर पोलीस अधीक्षक गणेश बिरादार, उपविभागीय पोलीस अधिकारी डॉ. सुदर्शन राठोड, पोलीस निरीक्षक वैशाली पाटील यांनीही मार्गदर्शन केले.**



असोसिएशनचे अध्यक्ष धनंजय जामदार, कार्यकारणी सदस्य संभाजी माने, हरिश्चंद्र खाडे, उद्योजक राजाराम सातपुते, राजेंद्र पवार, अविनाश सावंत, अरुण म्हसवडे, विवेक सातपुते, शिवराज जामदार, रियल डेअरीचे मनोज तुपे, पियाजोचे चंद्रकांत काळे, किर्लोस्करचे विशाल शिंदे, डायनामिक्सचे मुकेश चव्हाण यांनी या बैठकीत सहभागी होऊन बारामती इंडस्ट्रियल डेव्हलपमेंट असोसिएशनच्या माध्यमातून अनेक प्रस्ताव उपस्थित वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांसमोर मांडले.


एमआयडीसीत नवीन पार्किंग झोन, पेन्सिल चौकात सिग्नल यंत्रणा, स्पीड ब्रेकर्स, रंबलर्स, ब्लिंकर्स, पोलीस चौकी, चोरींना आळा, भंगारवाल्यांची नोंद, सीसीटीव्हीची व्याप्ती, कामगारांची पडताळणी, महिला कामगारांच्या सुरक्षेसाठी बंदोबस्त, सूचनापेटी, गस्त वाढवणे, स्वतंत्र पार्किंग, उद्योग संवाद कक्ष असे प्रस्ताव मांडले.

पोलीस अधीक्षक गिल यांनी खंडणी व गंभीर गुन्ह्यांविरुद्ध कठोर कारवाईचे आश्वासन दिले. उद्योजकांनी निर्भयपणे गुन्हे नोंदवावेत, असे आवाहन त्यांनी केले. अपर पोलीस अधीक्षक बिरादार आणि डॉ. राठोड यांनीही सहकार्याचे आश्वासन दिले. बैठकीनंतर आषाढी वारीत सहकार्य करणाऱ्या व्यक्ती, संस्था व कंपन्यांचा प्रशस्तीपत्र देऊन सन्मान करण्यात आला.

# वैद्यकीय शिक्षण क्षेत्रात गुंतवणूकीच्या अमिषाने २ कोटींची फसवणूक; चौघांचा अटकपूर्व जामीन फेटाळाला

**पुणे । प्रतिनिधी**

**वैद्यकिय शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक केल्यास दुप्पट परतावा देण्याच्या अमिषाने २ कोटी रुपयांची फसवणूक करणाऱ्या चौघांना न्यायालयाने दणका दिला आहे. चौघांनी अटकपूर्व जामिनासाठी केलेला अर्ज अतिरिक्त सत्र न्यायाधीश ए.एस.वाघमारे यांनी फेटाळला.**




जामिनास सरकारी पक्षातर्फे मारूती वाडेकर यांनी, तर मुळ फिर्यादीच्या वतीने ॲड. रमेश खेमू राठोड यांनी विरोध केला.चौघे सराईत आहेत. शिक्षण क्षेत्रात गुंतवणूकीच्या अमिषाने फसवणूकीचे असे अनेक गुन्हे केले आहेत.

'किर्गिस्तान' या देशात तर त्यांना प्रवेशास बंदी घातली आहे. हा गंभीर स्वरूपाचा गुन्हा असून, सखोल तपासासाठी चौघांना अटक करणे गरजेचे आहे. त्यामुळे अटकपूर्व फेटाळण्याची मावणी ॲड. वाडेकर आणि ॲड. रमेश राठोड यांनी केली. गोपालन अनिष,मनिष कुमार अगरवाल, पराग गर्ग आणि मुकुल जैन अशी जामीन फेटाळलेल्यांची नावे आहेत. याबाबत संतोष सेवू पवार (वय ३७, रा. बावधन बुद्रुक) यांनी बावधन पोलिसात फिर्याद दिली आहे. संतोष यांचा जमीन खरेदी-विक्रीचा व्यवसाय आहे. २०१९ मध्ये संतोष यांची एका व्यक्तीच्या माध्यमातून चौघांची ओळख झाली. चौघे प्रिविन प्रेपरेटिव्ह प्रा.लि. कंपनी नोएडा उत्तरप्रदेशचे संचालक आहेत. ही कंपनी शिक्षण क्षेत्रात कार्यरत आहे, असे संतोष यांना सांगण्यात आले होते. शिक्षण क्षेत्रात गुंतवणूक केल्यास दुप्पट परतावा देण्याचे अमिष दाखवत संतोष यांना गुंतवणूक करण्यास भाग पाडले. संतोष याने जानेवारी २०२२ मध्ये रोख स्वरूपात १ कोटी रुपये दिले. तर ऑनलाईन पध्दतीने १ कोती रुपये दिले. मात्र, त्यांना परतावा मिळलाच नाही. उडवाउडवीची उत्तरे देण्यात येत होती. त्यामुळे त्यांनी पोलिसात धाव घेतली. यामध्ये चौघांनी ॲड. विपुल दुशिंग यांच्यामार्फत जामिनासाठी अर्ज केला होता.

# मुळशीच्या जंगलात शस्त्रांचा वापर करत गोळीबाराची चाचणी, पौड पोलिसांनीच न्यायालयाची दिशाभूल केली ?

पुणे : मुळशीच्या जंगलात ७-८ पिस्तुलांचा वापर करत गोळीबाराचा सराव केल्याचा प्रकार काही दिवसांपूर्वी समोर आला होता .या प्रकरणात ८ जुलैला गणेश मोहिते या आरोपीला अटक करत येरवडा कारागृहात ठेवण्यात आलं होतं . पण आता या सगळ्या प्रकरणात कोर्टाची दिशाभूल माहिती लपवणे खोटे पुराव्या आणि दुहेरी गुन्हा दाखल केल्याचा आरोप पौड पोलिसांवर करण्यात आलाय . आरोपीच्या वकिलांनी पौड पोलिसांवर गंभीर आरोप करत पोलिसांविरोधात कारवाईची मागणी केलीय .




मुळशी तालुक्यातील जंगलात शस्त्रांचा वापर करून गोळीबाराचा सराव केल्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या गणेश मोहिते या आरोपीने पौड पोलिसांनी न्यायालयाची दिशाभूल केल्याचा आरोप केलाय .न्यायालयात मारहाणीबाबत तक्रार दाखल केली आहे .यावर न्यायालयाने १४ जुलै रोजी पोलीस प्रशासनाचे नोटीसही बजावली आहे .

मुळशीच्या जंगलात सात ते आठ पिस्तुलांचा वापर करून गोळीबाराची चाचणी केल्याप्रकरणी आठ जुलै रोजी गणेश मोहिते याला येरवडा कारागृहातून अटक करण्यात आली .या कारवाईसाठी पोलिसांनी व्हाट्सअप रेकॉर्डिंगचा आधार घेतल्याचे सांगितले होते .मात्र बचाव पक्षाच्या म्हणण्यानुसार, सासवड पोलीस ठाण्यात यापूर्वी जमीन व्यवहाराशी संबंधित गुन्हा दाखल असून त्याच प्रकरणातला आरोप पुन्हा नव्याने नोंदवण्यात आला .व पौड पोलिसांनी शस्त्र कायद्यानुसार स्वतंत्र गुन्हा दाखल केला .त्यामुळे एकाच प्रकरणावर आधारित दोन गुन्हे दोन ठिकाणी दाखल करण्यात आले असा आरोप करण्यात आला आहे .

या प्रकरणात आरोपी गणेश मोहितेचे वकील ॲड.प्रसन्न कुमार जोशी,प्रथमेश गांधी आणि साक्षी कुसाळकर यांनी न्यायालयात या संदर्भात अर्ज दाखल करत काही मुद्दे उपस्थित केले. न्यायालयास दिशाभूल करणारी माहिती दिली गेली .बनावट कागदपत्र आणि खोटे पुरावे सादर करण्यात आले .सासवड पोलिसांनी अटकपूर्व जामीन दिलेल्या आणि नोटीस देऊन सोडलेल्या आरोपीची माहिती पौड पोलिसांनी लपवली . याच माहितीच्या आधारे गणेश मोहितेची पोलीस कोठडी वाढवण्याची मागणी करण्यात आली .असा आरोप बचाव पक्षाच्या आरोपींनी केलाय .बचाव पक्षाने दाखल केलेले अर्जात, भारतीय न्याय सुरक्षा संहितेचे कलम २२३, २२५, २३४ आणि २३६ या कलमांचा आधार घेत पोलिसांविरोधात गुन्हा नोंदवण्याची मागणी करण्यात आली आहे. न्यायालयाने यावर विचार करत पोलीस प्रशासनाला नोटीस बजावली आहे.

# महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या अध्यक्षपदी हनुमंत गावडे तर ललित लांडगे सरचिटणीस

पुणे : महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या २०२५ ते २०२९ या कार्यकालासाठीची निवडणूक बिनविरोध पार पडली असून, अध्यक्षपदी हनुमंत बाळासाहेब गावडे तर सरचिटणीसपदी ललित बाळासाहेब लांडगे यांची निवड करण्यात आली आहे. ही निवडणूक प्रक्रिया १४ ते १६ जुलैदरम्यान कात्रज येथील स्व. मामासाहेब मोहोळ कुस्ती संकुलात पार पडली. निवडणूक प्रक्रियेचे संपूर्ण कामकाज निवृत्त न्यायाधीश शिवाजी मधुकर बेलकर यांच्या देखरेखीखाली पार पडले.



नवीन कार्यकारिणीची यादी पुढीलप्रमाणे :

अध्यक्ष : हनुमंत बाळासाहेब गावडे. कार्याध्यक्ष : दयानंदजी रामचंद्रजी भक्त. उपाध्यक्ष : भगतसिंग भुजगसिंग गाडीवाले, भरत किसन मेकाले, मुरलीधर विठ्ठलराव टेकुलवार, ज्ञानदेव रामचंद्र जाधव, अशोक ज्योतीराम माने, उमेश विश्वनाथ चौधरी सरचिटणीस : ललित बाळासाहेब लांडगे. खजिनदार : अमृता पांडुरंग भोसले. विभागीय चिटणीस : सुनील बबनराव देशमुख, काबुलीवाले श्याम देवीचंदजी, प्रल्हाद गंगाराम आळणे, रंगराव बंडू पाटील. कार्यकारिणी सदस्य : सुनील बुधाजी चौधरी, राणू मारुती दोरकर, चंद्रशेखर मारोतराव पडगेलवार, दिलीपसिंग भुजंगसिंग गाडीवाले, नवनाथ गुलाब घुले, ज्ञानेश्वर रघुनाथ मांगडे, मंगलसिंग विजयसिंग पवार, बजरंग किसन मेकाले, गोरखनाथ सोमनाथ भिकुले, सतीश विठ्ठलराव वानखेडे.निवडणूक बिनविरोध झाल्यामुळे कुस्तीगीर परिषदेच्या नव्या नेतृत्वाकडून आगामी काळात कुस्तीच्या विकासासाठी प्रभावी पावले उचलली जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पुणे जिल्ह्यात धरणांतून मोठ्या प्रमाणात पाणी सोडण्याची शक्यता;

**पुणे ।प्रतिनिधी**

पुणे जिल्ह्यात हवामान खात्याने मुसळधार पावसाचा इशारा (रेड अलर्ट) जारी केला आहे. यामुळे मुळा, मुठा आणि पवना नदीच्या काठावरील नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. जलसंपदा विभागाच्या खडकवासला पाटबंधारे विभागाने दिलेल्या माहितीनुसार, धरणांच्या पाणलोट क्षेत्रात सातत्याने पाऊस सुरू असल्याने धरणांमध्ये मोठ्या प्रमाणात पाण्याचा येवा होत आहे. परिणामी, धरणातील पाणीसाठा नियंत्रित ठेवण्यासाठी आज, दि. १५ जुलै २०२५ रोजी मोठ्या प्रमाणात पाण्याचा विसर्ग करण्याची शक्यता आहे.


पावसाच्या तीव्रतेनुसार विसर्गात टप्प्याटप्प्याने वाढ होण्याची शक्यता विभागाने वर्तवली आहे. यामुळे पुणे आणि पिंपरी-चिंचवड महानगरपालिका क्षेत्रात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. नदीकाठावरील नागरिकांना नदीपात्रात असलेली वाहने, जनावरे किंवा इतर साहित्य तात्काळ सुरक्षित ठिकाणी हलवण्याचे आवाहन करण्यात आले आहे. तसेच, सर्व नागरिकांना सतर्क राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

जलसंपदा विभागाने संबंधित प्रशासकीय विभागांना तात्काळ माहिती देऊन आवश्यक खबरदारी घेण्याचे निर्देश दिले आहेत. मध्यवर्ती पूर नियंत्रण कक्षाच्या संनियंत्रण अधिकारी श्वेता कु-हाडे यांनी याबाबत स्थानिक प्रशासनाला सज्ज राहण्याचे आवाहन केले आहे. नागरिकांनीही प्रशासनाच्या सूचनांचे पालन करून स्वतःची आणि आपल्या मालमत्तेची काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# ज्येष्ठ पत्रकार अमित गोळवलकर यांचे निधन

**पुणे । प्रतिनिधी**

**'सकाळ माध्यम समुहा'चे विशेष प्रतिनिधी आणि माजी**



**राष्ट्रीय वॉटरपोलो खेळाडू अमित सदानंद गोळवलकर (वय ५७) यांचे अल्पशा आजाराने बुधवारी निधन झाले. त्यांच्या पश्चात आई, पत्नी आणि मुलगा असा परिवार आहे.**

शालेय जीवनात जलतरण या क्रीडा प्रकारात प्राविण्य मिळवत १९८५ मध्ये कोलकाता येथे झालेल्या राष्ट्रीय वयोगट वॉटरपोलो खेळात त्यांनी राज्याचे प्रतिनिधित्व केले होते. डेक्कन जिमखाना क्लबच्या टिळक जलतरण तलावाचे ते सहा वर्षे सचिव होते. सुरवातीला ते 'दै. केसरी'तर्फे दिल्ली प्रतिनिधी होते.

त्यानंतर ते 'सकाळ', 'ई-सकाळ', 'साम टीव्ही' मध्ये कार्यरत होते. अजमल कसाब प्रकरणातील तपास अधिकारी रमेश महाले यांचे 'कसाब आणि मी' हे पुस्तक त्यांनी शब्दबद्ध केले आहे. तसेच त्यांनी काही पुस्तकांचा अनुवाद केला होता.

# कचरा रॅम्पचे होणार यांत्रिकीकरण - आयुक्त नवल किशोर राम

पुणे : शहरातील कचरा संकलन, वाहतूक तसेच रॅम्पवरून तो प्रक्रिया प्रकल्पात पाठवला जातो. मात्र, ही कामे कर्मचाऱ्यांच्या माध्यमातून केली जात असल्याने ती प्रभावीपणे होत नाहीत. परिणामी, कचऱ्याची दुर्गंधी, लिचेट, पक्षी तसेच अस्वच्छता मोठ्या प्रमाणात पसरते. तसेच अवस्थाही अतिशय वाईट आहे. त्यामुळे कचरा संकलन, वाहतूक तसेच रॅम्पचे यांत्रिकीकरण करण्यावर भर दिला जाणार असल्याची माहिती महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी पत्रकारांशी बोलताना दिली.



हडपसर परिसरातील कचरा रॅम्पच्या ठिकाणी मोठ्या प्रमाणात कचरा उघड्यावर पडत असल्याने तसेच उघड्या वाहनांमधून वाहतूक होत असल्याने या रॅम्पच्या परिसरात मोठ्या प्रमाणात पक्षांचा उपद्रव वाढला आहे. त्याचा फटका लोहगाव विमानतळाला बसत असून या पक्षांमुळे विमानांना उड्डाण करताना तसेच उतरताना धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या रॅम्पसह उर्वरित सर्वच रॅम्पचे यांत्रिकीकरण करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

शहरात महापालिकेचे मुख्य सात कचरा वाहतूक रॅम्प आहेत. हे रॅम्प शहराच्या वेगवेगळ्या भागात आहेत. यामधील केवळ कात्रज येथील रॅम्पचे इंदोरच्या धर्तीवर यांत्रिकीकरण करण्यात आलेले आहे. तर उर्वरित कामासाठी खर्च अधिक असल्याचा निष्कर्ष काढत महापालिकेने हे काम मागे ठेवले होते.

पण, प्रत्यक्षात महापालिकेला कचरा वाहतूक, त्यामुळे निर्माण होणाऱ्या दुर्गंधीची समस्या, औषध फवारणी, अस्वच्छतेमुळे निर्माण होणाऱ्या समस्या अशा कामांसाठी दरवर्षी कोट्यवधींचा खर्च करावा लागतो. त्यामुळे असे खर्च कमी करून यांत्रिकीकरणावर भर देण्यात येणार असल्याचे आयुक्तांनी सांगितले. तसेच या विभागासाठी अशा तातडीच्या कामांसाठी स्वतंत्र निधीही उपलब्ध करून देणार असल्याचे त्यांनी नमूद केले.

# संजय जगताप यांचा भाजपमध्ये पक्षप्रवेश; आगामी निवडणुकी आधी काँग्रेसला मोठा धक्का; रवींद्र चव्हाणांची उपस्थिती

पुणे: काँग्रेसचे माजी आमदार संजय जगताप यांचा आज भाजपमध्ये पक्षप्रवेश पार पडला. पुरंदर हवेलीचे माजी आमदार संजय जगताप (डरपक्षरू गरसींर) भाजपच्या वाटेवर असल्याची काही दिवसांपासून चर्चा होती. सासवड आणि जेजुरी येथील काँग्रेसच्या माजी नगरसेवकांनी संजय जगताप यांना भेटून भाजपमध्ये प्रवेश करण्याची मागणी केली होती. त्यानंतर आज सासवडमध्ये भाजपचे नवनिर्वाचित प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या उपस्थितीत संजय जगताप यांचा पक्षप्रवेश पार पडला आहे, या पक्षप्रवेशामुळे आगामी निवडणुकीआधी काँग्रेसला मोठा धक्का बसला आहे.



पक्षप्रवेशानंतर बोलताना संजय जगताप म्हणाले, पक्षप्रवेशाला वेळ झाला आणि कार्यक्रमाच्या ठिकाणी उपस्थित राहायला उशीर झाला त्यासाठी दिलगीरी व्यक्त करतो, उर्वरीत पक्षप्रवेश काही वेळाने पूर्ण होतील. मी तुम्हा सर्वांचे आभार मानतो असंही जगताप म्हणालेत. माझ्या स्वभावात दोष आहे मी कायम उशीरा पोहोचतो त्यासाठी यावेळी जगताप यांनी दिलगिरी व्यक्त केली. देवेंद्र फडणवीस यांचं नेतृत्व आणि भाजपची साथ आपल्याला लाभली आहे, असंही यावेळी कार्यक्रमात संजय जगताप यांनी म्हटलं आहे. तिथे विकास आहे, तिथे राजकारण नाही, इथे कोणत्याही शेतकऱ्याच्या डोक्यावर पाय देऊन विकास होत नाही, इथे विकास होतो. या विचाराकडे येण्याचं माझं हेच कारण आहे. भाजपचा कार्यकर्ता म्हणून मी आज पक्षप्रवेश केला आहे.

आज ३ हजार प्रवेश आपल्याला करायचे होते. पण, यादी कमी करून ३७८ प्रवेश आहेत. फक्त संजय जगताप प्रवेश करत नाहीत तर प्रत्येक कार्यकर्ता या ठिकाणी प्रवेश करतो आहे. माझ्या स्वभावामध्ये दोष आहे मी कधीच वेळेवरती येत नाही. माझे अनेक प्रश्न प्रलंबित आहेत, पाण्याचे प्रश्न प्रलंबित आहेत, विमानतळाचा मोठा प्रश्न आहे. विमानतळ हे पुरंदर तालुक्यातच होणार आणि योग्य ठिकाणी होणार असा मी तुम्हाला शब्द देतो. कुठलाही प्रकल्प शेतकऱ्यांच्या डोक्यावर पाय देऊन होत नाही. सर्वसामान्यांच्या खात्यात पैसे देण्याचे काम नरेंद्र मोदी आणि भारतीय जनता पक्षाने केलं आहे. सामाजिक समरसतेचे विचार मला भावला त्यामुळे मी पक्षप्रवेश करत आहे. एखाद्याला पक्षात घेताना खूप अडचणी तयार होतात. तुम्ही मला सामावून घेतले असंही पुढे संजय जगताप यांनी म्हटलं आहे.

# दीपक काटेचा गॉडफादर कोण?, प्रवीण गायकवाडांनी व्हिडिओ क्लीपच दाखवली

संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष प्रवीण गायकवाड यांच्यावर अक्कलकोट येथे शाईफेक करत हल्ला करण्यात आला. या प्रकरणी प्रवीण गायकवाड यांनी बुधवारी (दि. १६ जुलै) पत्रकार परिषद घेत गंभीर आरोप केले. मास्टरमाईंड कोण? हे मी पुराव्यानिशी सांगितलं आहे. गुन्हेगाराला मुक्त सोडून माझ्या हत्येसाठी पाठवले, असा आरोप गायकवाड यांनी केला. ज्याचा बंदोबस्त करायचा त्याला जशास तसे उत्तर देणार, ही या सरकारच्या शेवटाची सुरुवात आहे. तुम्ही हल्लेच करणार असाल तर ती तुमची जबाबदारी आहे, असेही त्यांनी म्हटले.

दीपक काटे याने माझ्यावर हल्ला केला. या प्रकरणी आयोजकाकडून कुठलीही पोलिस तक्रार नोंदवली नाही. काटे याची पार्श्वभूमी गुन्हेगारी स्वरुपाची आहे. त्याने स्वतःच्या भावाच्या खुनापासून शिक्षा भोगली आहे. त्याच्यावर जवळपास खंडणीपासून अनेक गंभीर गुन्हे आहेत. त्याला भाजपच्या युवा मोर्चाचे सरचिटणीसपद दिले आहे. बावनकुळे हे प्रदेशाध्यक्ष असताना दीपक कुटे




त्यांच्यासोबत सतत दिसले असल्याचे सांगत गायकवाड यांनी तशा व्हिडिओ क्लीपही पत्रकार परिषदेत दाखवल्या.

'जामीनावर सुटल्यावर काटने गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला'

विमानतळावर काटेला २ पिस्तूल, २८ काडतूसे सापडल्या प्रकरणी अटक झाली. अशा परिस्थितीत त्याला जामीन देता येत नाही, असे असताना तपास अधिकाऱ्याने न्यायालयात खोटी माहिती दिली. न्यायालयासमोर काटेची गुन्हेगारी पार्श्वभूमी समोर आणली नाही. ज्या आरोपीला मोका लावणे गरजेचे आहे त्याला मुक्त सोडले गेले. मुक्त सोडल्यानंतर त्याने गंभीर स्वरुपाचा गुन्हा केला, असेही गायकवाड यांनी सांगितले.

पोलीस ऐकूण घेण्याच्या मनस्थितीत नाही. पोलिसांचा हे प्रकरण दाबण्याचा प्रयत्न आहे, असा आरोपही त्यांनी केला. संघपरिवारात ज्या संघटनांचा बंदोबस्त करावा असे सांगितले. त्यात संभाजी ब्रिगेड, मराठा सेवा संघ आणखी काही संघटना आहेत. '४०० पार, शत प्रतिशत भाजप'च्या आड आम्ही येतो म्हणून आमच्यावर हल्ला केल्याचाही गंभीर आरोप त्यांनी केला.